
# हाकारा



# महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

**मार्गदर्शक** प्रा. गं. बा. सरदार

## कार्यकारी मंडळ

| | |
|---|---|
| **अध्यक्ष** | जनार्दन वळवी |
| **उपाध्यक्ष** | शरद कुलकर्णी |
| **चिटणीस** | रा. के. मुटाटकर |
| **सहचिटणीस** | जगदीश गोडबोले |
| **खजीनदार** | बाबुल पठाण |
| **सभासद** | विजय भानू |
| | गोविंद गारे |
| | श. गो. देवगावकर |
| | नान्सी गायकवाड |
| | दर्शन शंकर |

## सल्लागार मंडळ

| | |
|---|---|
| बाबा आढाव | जयंत पाटील |
| बाबा आमटे | विजय परुळकर |
| रावसाहेब कसबे | अनंतराव बोधनकर |
| सुधा काळदाते | अनुताई वाघ |
| विजय तेंडुलकर | विलास संगवे |
| वि. म. दांडेकर | वाहरु सोनवणे |
| मधुकर देवल | गीता साने |
| चित्रा नाईक | छाया सुरतवंती |
| आ. ना. नारळकर | दत्ता सावळे |

कष्टकरी जनता, भूषण भारता, वंदन करितो पददलिता ।

# हाकारा



( महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे त्रैमासिक )

## अनुक्रमणिका


संपादकीय ... २

वैदू : परंपरागत आरोग्य व्यवस्था
**मोहन मुत्यलवार** ... ४

वैदूंच्या मुलाखती
**शुभदा देशमुख** ... ५

स्त्री–आरोग्यप्रबोधनविषयक चल–शिबिर
**शैलजा देवगावकर** ... ८

मागासवर्गीय मुलांच्या शिक्षणातील अडचणी
**मॅक्सीन बर्गसन** ... ९

आदिवासी मुलांसाठी अनौपचारिक शिक्षण-प्रकल्प
**कमल पाध्ये** ... ११

वृत्तविशेष ... १४

आदिवासी बोलीभाषा प्रकल्प
**सुनीता द. जोशी** ... १५

आदिवासी भागातील औषधी वनस्पती
**रमेश म. नानल** ... १७

कविता
**भुजंग मेश्राम** ... २१

कायदेशीर हस्तांतरित जमिनी
**शरद कुलकर्णी** ... २२

आश्रमशाळांच्या सुधारणेसाठी शिफारशी
**पुरुषोत्तम सिरसाळकर** ... २४

भटक्या जमातीच्या व्यथांची कहाणी
**रमाकांत रामचंद्र** ... ३०

आदिवासी विकास परिषद वृत्तांत
पाठ परिवर्तनाचे
**सुधीर जोग** ... ३५

पुस्तक परीक्षण ... ३७

संस्था परिचय ... ३९



वर्ष पाचवे : चौथा
ऑक्टोबर–डिसेंबर १९८४
परिषद / हाकारा संयुक्त
वार्षिक वर्गणी : २० रुपये
एका अंकाची किंमत : ४ रुपये
पत्रव्यवहाराचा पत्ता :
रा. के. मुटाटकर, सचिव
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
ई/५, प्राध्यापक निवास
पुणे विद्यापीठ
पुणे ४११ ००४.

**संपादक मंडळ**
जगदीश गोडबोले
शरद कुलकर्णी
राजाभाऊ राजगडकर
**संपादक**
रामचंद्र मुटाटकर
**संपादन साहाय्य**
सुषमा सोनक
रमाकांत पाटील
**मुखपृष्ठ**
मिलन खानोलकर

प्रकाशक : प्रा. रा. के. मुटाटकर सचिव, महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद, पुणे यांनी महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद, पुणे यांचेसाठी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे ४११ ०३०, येथे छापून प्रसिद्ध केले.


**मुखपृष्ठ :** धुळे जिल्ह्यातील आदिवासींत औषधी उपयोगासाठी वापरल्या जात असलेल्या ‘ कंदर ’ या वनस्पतीची पाने.

संपादकीय

# पाच वर्षांची वाटचाल

**महात्मा गांधींसारख्या युगपुरुषाची हत्या जागतिक पातळीवर धक्कादायक घटना ठरली. परंतु ती हत्या एका महात्म्याची झाली, राजकीय पुढाऱ्याची नाही ही भावना होती. नेहरू, पटेल सारखे राजकीय पुढारी देशाचे नेतृत्व करीतच होते. इंदिरा गांधींची हत्या ही राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील राजकीय व ऐतिहासिकदृष्ट्या अतिशय महत्त्वाची घटना आहे. तिसऱ्या जगात कोणतेही राष्ट्र बलवान बनू नये ही मोठ्या राष्ट्रांची इच्छा असणे स्वाभाविक आहे.** त्यामुळे आशिया, अफ्रिका व दक्षिण अमेरिकेतील राष्ट्रांचे नेतृत्व करण्याची कुवत असणाऱ्या भारतात विघटनवादी शक्तीस खतपाणी घालण्याचे कार्य काही बडी राष्ट्रे करीत आलेली आहेत. पंजाबचा प्रश्न व इंदिराजींची हत्या ही त्याचीच परिणती होय.

इंदिरा गांधींची हत्या त्यांच्या निवासस्थानी त्यांच्याच संरक्षकांकडून व्हावी ही देशाच्या दृष्टीने अत्यंत शरमेची बाब आहे. आपल्या प्रशासनातील गलथानपणाचे ते एक मूर्तिमंत उदाहरण आहे. इंदिरा गांधींच्या मृत्यूनंतर देशात अराजक माजेल असे भविष्य वर्तविणारे पाश्चिमात्य मुत्सद्दी खोटे ठरले ही त्यातल्या त्यात देशाच्या दृष्टीने अभिमानास्पद गोष्ट आहे. देशातील गरीब जनतेला व देशाला अशिक्षित म्हणून हिणविणाऱ्या प्रवृत्तीने लोकांच्या वागण्यापासून बोध घ्यावा. सामान्य माणूस काय विचार करतो, कसा वागतो हे समजणे आवश्यक आहे. सामान्य लोकांना देशाचा विचार करता येतो हे सिद्ध झाले आहे.

इंदिरा गांधींनी आदिवासी व दलितांबद्दलचा कळवळा पंडित नेहरूंकडून उचलला. तोच वारसा राजीव गांधी चालू ठेवतील असा आम्हाला विश्वास वाटतो. राजकीय कारणांसाठीही ते आवश्यक आहे.

महाराष्ट्रात आधुनिक महाराष्ट्राची निर्मिती करणारे व सर्वांगीण विकासाचे पाऊल टाकणारे, सर्वांना बरोबर घेऊन चालणारे, मृदूभाषी यशवंतराव चव्हाण हेही निर्वतले. त्यांची अखेरची वर्षे फारशी समाधानकारक नव्हती. तरी यशवंतराव चव्हाणांनी महाराष्ट्रात तळागाळात लोकशाही रुजविली व शिक्षणाचा व्यापक प्रसार केला तो कधीच विसरता येणार नाही.

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद इंदिरा गांधी व यशवंतराव चव्हाण यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करते. तसेच सामान्य माणसाप्रमाणेच राजीव गांधीच्या नेतृत्वाखालील नवीन शासनाबद्दल आशा बाळगून आहे. आशा क्रांतीची नाही; पण स्वच्छ कारभाराची आहे. दलित, आदिवासी यांना वेळोवेळी देण्यात येणाऱ्या आश्वासनांच्या पूर्तीबद्दल आहे.

बऱ्याच काळानंतर भारत सरकारने शिक्षण व आरोग्य खात्यात कॅबिनेट दर्जाचे मंत्री नेमले आहेत. ही स्वागतार्ह घटना आहे. तसेच समाजकल्याण विभागात स्त्रीकल्याणाचा वेगळा नामनिर्देश केला आहे. यावरून सरकारची या विषयांबाबतची जागरूकता उघड होते.

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेने १ जानेवारी १९८० साली हाकारा या त्रैमासिकाची सुरुवात केली. त्यावेळी आदिवासींच्या प्रश्नांना वाहिलेले व चिंतनात्मक त्रैमासिक चालेल किंवा नाही याबाबत बरेच मित्र साशंक होते. परंतु आपण अंगिकारलेल्या कार्यास पाठिंबा दिला पाहिजे या सज्जनशील व अनुशासनशील भावनेने भरघोस पाठिंबा मिळाला व हाकाराने पाच वर्षे पूर्ण केली. हाकारा व्यापारी तत्त्वावर चालविण्यात येत नाही. लेखकांना मोबदला नाही. परिषदेच्या व हाकाराच्या संपादनाचे काम करणाऱ्यांना अतिशय अल्प मानधन मिळते तरी आनंदाने ते काम होते. बऱ्याच कारणांनी हाकारा वेळेवर निघत नाही. कधी संपादनकार्यात अडचणी येतात, कधी प्रेसला वेळ नसतो अशी अनेक कारणे असतात.

प्रारंभी जगदीश गोडबोले यांनी हाकाराचा पाया घातला व मजबूत केला. त्यांचे मित्र जोडण्याचे कौशल्य, प्रवास, सफर व लेखनाची हातोटी यामुळे हाकारा लोकमान्य झाला. त्यांनी हाकाराच्या जबाबदारीची कालमर्यादा घातली होती. ती संपल्यावर सुधीर जोग पुढे झाले. त्यांनी एक वर्ष हाकारा संपादनाचे कार्य मेहनतीने केले. पुण्यातील प्रसिद्ध राजा केळकर संग्रहालयाच्या 'क्युरेटर' या पदाची जबाबदारी त्यांनी स्वीकारल्याने त्यांनाही वेळ मिळेनासा झाला. आता सुषमा सोनक व रमाकांत पाटील यांनी हाकाराची जबाबदारी घेतली आहे. जगदीश गोडबोले व सुधीर जोग यांचे सक्रीय सहकार्य आहेच; परंतु त्यांच्या इतर जबाबदाऱ्या वाढल्याने काळाचे बंधन आहे. पुण्याच्या दैनिक वृत्तपत्रातील मित्रही संपादनाच्या कामात मदत करतात परंतु त्यांनी निनावी राहायचा आग्रह धरलेला आहे. ते कामाचा मोबदलाही स्वीकारीत नाहीत. त्यांचे आभार कसे मानावयाचे ? साप्ताहिक मुद्रणाचे आमचे संबंध व्यापारी तत्त्वावर आधारलेले नाहीत, मित्रत्वाचे आहेत. आम्ही त्यांच्यावर हक्क गाजवतो व ते प्रेमाने मान्य करतात.

तरी आमच्या मनात हाकाराबाबत सतत रुखरुख असते. हाकारा आदिवासींसाठी आहे; परंतु त्यातील लेखक जास्त प्रमाणात शहरी सुशिक्षित आहेत. आम्हाला आदिवासी कार्यकर्त्यांचा व आदिवासी क्षेत्रात कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांचा लेखनात जास्त सहभाग हवा आहे. तसंच महाराष्ट्रातील सर्व भागातील सहभाग हवा आहे. हाकाराचा वाचकवर्ग हा मोठ्या प्रमाणावर आदिवासी भागातील असला पाहिजे यातच आम्ही आमचे यश मानू. त्या दृष्टीने सहाव्या वर्षात पदार्पण करताना वाचकांकडून जास्त प्रतिसादाची इच्छा आहे.

आजकाल भ्रष्टाचाराचा बोलबाला बराच झाला आहे. भ्रष्टाचार सर्वमान्य आहे असे बोलतात, त्याची प्रचीतीही येते; परंतु या सर्वांपासून दूर खेड्यात दुर्गम भागात सुशिक्षित तरुण, तरुणी निस्वार्थीपणे विकासाचे, जनजागरणाचे कार्य करीत आहेत व अशा तरुण–तरुणींचा महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेशी संबंध आहे, जिव्हाळ्याचा संबंध आहे, हे आमचे परम भाग्य. पाच वर्षानंतरही हे संबंध टिकले आहेत, वाढीस लागले आहेत, ते आणखी वृद्धिंगत व्हावे हीच १९८५ ची इच्छा.

# वैदू : परंपरागत आरोग्य व्यवस्था

मोहन मुत्यलवार



आदिमानवापासून प्रगत मानवापर्यंत मानव हा सतत प्रयोगशील राहिला आहे. सभोवतालच्या परिसराचा उपयोग करून स्वतःचे जीवन जास्तीत जास्त सुखकर करण्याचा तो सतत प्रयत्न करीत आला आहे. त्याला होणाऱ्या व्याधीपासून तो त्याच्याजवळ उपलब्ध वनस्पती, प्राणी, खनिज यांचा उपयोग करून स्वतःचे रक्षण करीत आला आहे. निरनिराळ्या संस्कृतीत त्या त्या संस्कृतीची वेगळी अशी प्राचीन आरोग्यव्यवस्था त्याने निर्माण केली आहे. आयुर्वेद ही भारतीय संस्कृतीने दिलेली प्राचीन आरोग्यव्यवस्था. आयुर्वेदाचे मूळ आदिवासी संस्कृतीत आहे. आयुर्वेदाने जंगलात राहणाऱ्या आदिवासी, पुजारी, वैदूचे अनन्य साधारण महत्त्व स्पष्ट केले आहे.

भारतातल्या ग्रामीण आदिवासी भागात वैदू हा एक प्रमुख आरोग्यरक्षक म्हणून कार्य करीत आला आहे. अजूनही बहुतांश खेडयात वैदूशिवाय दुसरी कोणतीच आरोग्यव्यवस्था नाही. तिथला माणूस गावातल्या वैदूकडूनच आताही उपचार करून घेत आहे. वैदू गावात, गावाच्या आसपास असलेल्या जंगलांचा उपयोग करून लोकांच्या आरोग्याचे पिढयान-पिढयापासून रक्षण करीत आहे. गावातल्या लोकांना स्वस्त तिथल्या-तिथेच अस्तित्वात असलेली ही परंपरागत आरोग्य-व्यवस्था फार सुंदर रितीने आजपर्यंत कार्यरत होती.

लोकांच्या आरोग्यरक्षणाचे काम वैदू सेवा भावनेतून करत आला आहे. देवाने मला लोकांच्या सेवेसाठीच निर्माण केले आहे अशी त्याची श्रद्धा आहे. पैसा हे त्याचे मुल्य नव्हते, आजही नाही. लोकही वैदूला समाजात एक विशिष्ट मानाचे स्थान देत होते. त्याच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न सुद्धा ते स्थानिक लोकांच्या सहकार्याने सोडवित होते.

## पुनरुज्जीवन करण्याची गरज

अशी ही आरोग्यव्यवस्था सध्या नष्टप्राय होत आहे. पाश्चिमात्य आरोग्यव्यवस्थेच्या अतिक्रमणामुळे हे सेवेचे मुल्य पैशाच्या स्वरूपात बदलते आहे. झटपट सुई घेऊन आराम मिळविण्याच्या प्रयत्नात लोकांच्या आरोग्याची तसेच पैशाची सुद्धा अपरिमित हानी होत आहे. गरीब सामान्य माणूस यात होरपळून निघत आहे. त्यामुळे सामाजिक न्याय देण्याच्या भूमिकेतून पारंपारिक आरोग्यव्यवस्थेचे पुनरुज्जीवन करणे ही काळाची गरज आहे.

गेल्या दोन वर्षापासून मी गडचिरोली जिल्ह्यातील कुरखेडा व आरमोरी तालुक्यात वनस्पती औषधी व वैदूंचा अभ्यास करतो आहे. त्यांच्याशी संबंध प्रस्थापित करून त्यांचे प्रश्न काय आहे ? ते कसे सोडविता येईल ? त्यात वैदूंची, तसेच लोकांची काय जबाबदारी असेल ? परंपरागत औषधोपचाराच्या पद्धतीचा विकास व प्रसार कसा करता येईल ? सध्या अस्तित्वात असलेली आरोग्यव्यवस्था व परंपरागत आरोग्यव्यवस्था यामध्ये योग्य ते संबंध कसे प्रस्थापित करता येईल इ. प्रश्नांना घेऊन मी ह्या भागात काम करतो आहे.

मी आतापर्यंत ज्या वैदूशी संबंध प्रस्थापित केले आहेत. त्यातल्या ह्या क्षेत्रात रस असणाऱ्या वैदूंची दोन शिबीरे आयोजित केली होती. त्या शिबीरातून झालेल्या चर्चेत खालील मुद्दे स्पष्ट झाले.

बहुतेक वैदूंचे चरितार्थाचे साधन शेती हे आहे. वैदूकी त्यांच्या दृष्टीने समाजसेवा आहे. व्यवसाय नाही.

नव्या पिढीतील वैदूची संख्या अत्यल्प आहे. वैदूंची मुले वैदू बनण्यास इच्छुक नाहीत. वडिलांच्या कौशल्यावर त्यांचा विश्वास नाही. त्यांचा भर डॉक्टराकडून इंजेक्शन घेण्यावर आहे.

बहुतेक वैदूंना वनऔषधीचे ज्ञान त्यांच्या वडिलांकडून (वंशपरंपरागत) मिळाले आहे. स्वतःच्या मेहनतीने ज्ञान मिळविल्याचेही काही उदाहरणे आहेत.

शिबीरात आलेले सर्व वैदू पुरुष होते; परंतु थोड्या आदिवासी स्त्रीयाही वैदकी करीत असल्याचे समजले. त्यांना बहुधा हे ज्ञान त्यांच्या सासऱ्याकडून, पतीकडून मिळते.

काही वैदूंनी मुळव्याध, दमा, धनुर्वात, डबलनिमोनियासारखे रोग बरे केल्याचा दावाही करण्यात आला. माणसाच्या किंवा गुराच्या डॉक्टरने हात टेकल्यावर वैदूंच्या उपायाने गुण आल्याची बरीच उदाहरणे सांगण्यात आली.

रोगाचे निदान व औषधोपचार करताना शास्त्रीय पद्धतीने विचार करण्याची क्षमतासुद्धा वैदूमध्ये दिसून आली.

असे असले तरी वैदूंना पैसा व प्रतिष्ठा आता मिळेनाशी झाली आहे. लोकांची वृत्ती वैदूंच्या बाबतीत त्यांच्याच शब्दात 'फुकट करा पण चोकट करा' अशी झाली आहे.

वैदूंना कायद्याचे संरक्षण नसल्याने सरकारी यंत्रणेकडून होणाऱ्या त्रासाची भीती वाटते. त्यामुळे त्यांच्या प्रयोगशीलतेला मर्यादा पडतात.

वैदूंची औषधी वनस्पतींच्या व्यापाऱ्याकडून अक्षरशः लूट होत आहे.

जंगलतोडीमुळे बऱ्याच मोठ्या प्रमाणात वनऔषधी नष्ट झाल्या आहेत त्यामुळे त्यांना खूप दूरवर औषधी वनस्पतीसाठी भटकावे लागते. जंगलतोड चालूच राहिली तर ज्या काही औषधी वनस्पतींचा साठा सध्या शिल्लक आहे तो सुद्धा नष्ट होण्याची भीती आहे.

दोन्ही शिबीरात मिळालेला वैदूंचा प्रतिसाद माझ्या कामाला गती देणारा, उत्साहवर्धक आहे. ह्या क्षेत्रात काम करण्याची नवी जिद्द निर्माण झाली आहे. 'परंपरागत औषधी संशोधन व विकास केंद्र' आणि 'जागृत वैदू संघटना' ह्या भागात कार्यरत आहेत ह्या क्षेत्रात आस्था असणाऱ्या लोकांच्या सहकार्याने परंपरागत आरोग्यव्यवस्थेच्या विकासाचे व प्रसाराचे काम करता येईल.

❋

द्वारा– डॉ. सतिश गोगुलवार
मु. पो. कुरखेडा
जि. गडचिरोली, पिन ४४१२०९

---

# वैदूंच्या मुलाखती

शुभदा देशमुख

---

वैदू – ग्रामीण आरोग्य संस्थेतील परंपरागत दुवा असला तरी या व्यवसायात खूप कष्ट करावे लागतात, प्रतिष्ठा मात्र नाही. शिवाय त्यापासून पैसा मिळत नसल्याने आर्थिक आधारासाठी शेतीवरच अवलंबून राहावे लागते. हाच व्यवसाय पूर्णवेळ करता येत नाही.

**वैदू या शब्दानेच जादूटोणा करणारा भयंकर माणूस अशी काहीशी कल्पना शहरी माणसाच्या मनात उभी राहते. तथापि गडचिरोली जिल्ह्यात आल्यावर आणि वैदूंच्या संघटनेचे कार्य श्री. मोहन मुल्यलवार यांनी सुरू केल्यावर त्यांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेतांना ही सर्व भीती नाहीशी होऊन वैदुंबरोवर बोलणे हा एक सुखद अनुभव वाटला. त्यापैकीच काही वैदूंच्या मुलाखती पुढे दिल्या आहेत.** ◻

## मुलांनासुद्धा या व्यवसायाचा तिटकारा

### वैदू श्री. नकटू गोपा ठाकरे (मु. पो. चोप)

गडचिरोली जिल्ह्यातील आरमोरी तालुक्यात चोप हे छोटेसे गाव तेथील वैदू श्री. नकटू गोपा ठाकरे ५५ वर्षांचे हे गृहस्थ अतिशय बोलके आहेत. वनस्पती औषधे नव्हे तर संपूर्ण जंगल प्रश्नाविषयी डोळसपणा असणारे आहेत. गेल्या ३० वर्षापासून ते वनस्पती औषधाचा अभ्यास करीत आहेत.

**कोणाकडून ही विद्या शिकालात ?**

'स्वतःच्याच अनुभवाने. आपला गुरु–पुस्तक ! मी ३० वर्षापूर्वी आम्लपित्ताने आजारी झालो. त्यावेळी

मुंबईहून एक पुस्तक आणून अभ्यास केला. स्वतःवर प्रयोग केले. दुरुस्त झाल्यावर इतर रोगांवर अभ्यास सुरू केला. मी शाळेत जाऊन शिकलो नाही. माझ्या मालकाच्या मदतीने घरीच लिहायला वाचायला शिकलो रोगांचा अभ्यास करण्यासाठी 'घरचा राजवैद्य' 'वनस्पती प्रभाव' चित्रासहीत जडीबूट्टी 'अद्‌भुत औषधी' इ. पुस्तके वाचली. जलोधर, पडूरोग, धनुर्वातासाठी अभ्यास यामध्ये केला. धनुर्वाताच्या औषधीचा प्रयोग माझ्या स्वतःच्याच मुलावर केला. आतापर्यंत धनुर्वात झालेल्या १५ लोकांना दुरुस्त केले.

लखवा (अर्धांगवायु) झालेल्या चार लोकांना दुरुस्त केले. कुष्ठरोगावर पण औषध दिले आहे.

**'औषधाचे पैसे घेता का ?'**

नाही—नाही पुष्कळ लोकांना दुरुस्त केले; पण पैसे कोणाकडून घेतले नाही. लोक आमच्याकडून औषध घतात पण पैसे देत नाही. 'चोकट कर पण फुटक कर' ही आमच्याकडे येणाऱ्या लोकांची भावना असते. आमच्या औषधाला लोकांमध्ये आता जास्त किंमत नाही. लोक डॉक्टरकडे जास्त जातात.

डॉक्टरच्या औषधांचा उपयोग न झालेले रोगी आमच्याकडे येतात. काही रोगांवर वनस्पती औषध जास्त परिणाम करतात.

**औषध आणताना काही नियम पाळावे लागतात का ?**

बाकी काही नाही; पण देवाचे नाव घेऊनच औषधी आणतो. काही नक्षत्रावर आणि ग्रहणाच्या दिवशी मात्र औषधी गोळा करत नाही.

**औषध जास्त दिवस टिकण्यासाठी काय करता ?**

औषध वाळवून ठेवतो.

ह्या ज्ञानात अधिक भर घालण्याची इच्छा आहे, 'त्यासाठी काही खर्च करावा लागला तरी त्याची तयारी आहे मात्र त्यासाठी खर्च करणे परवडणार नाही असे त्यांनी सांगितले. मंत्रतंत्र, भूतबाधा यावर वैदू लोकांचा विश्वास असतो; पण हे गृहस्थ वाचतात औषधीविषयीचे ज्ञान मिळविलेले वाटले म्हणून मुद्दाम त्यांना त्याविषयी विचारले असता ते म्हणाले.'

'अंगातले समजते मंत्रतंत्र येतात फूल झाडणे (डोळ्यात टिक पडणे), पोटदुखी ह्या सारख्या आजारावर मंत्रांचा उपयोग होतो.'

वाड-वडीलांपासून आमच्या घरात ही विद्या चालत आली आहे. वडिलांनी मला ही विद्या शिकविली.

'वनस्पती औषधाचे ज्ञान इतरांना देण्याची इच्छा आहे पण माझी मुले सुद्धा हे काम करण्यास तयार नाहीत. एक तर ह्या व्यवसायात खूप कष्ट करावे लागतात. पण प्रतिष्ठा मात्र नाही. शिवाय त्यापासून पैसे मिळत नसल्याने आर्थिक आधारासाठी शेती वगैरेवर अवलंबून रहावे लागते. हाच व्यवसाय पूर्ण वेळ करता येत नाही. *

# गौरव तर दूरच पण सरकारी यंत्रणेकडून त्रास

**खुशाल झिंगर वघारे (विसोरा)**

वनस्पती औषधांचा उपयोग वैदू केवळ माणसासाठीच नाही तर गुरांसाठीही करतात. खुशाल वघारे हा २७ वर्षे वयाचा तरुण वैदू गुरांच्या रोगासाठी ह्या भागात नावाजलेला आहे. आरमोरी तालुक्यात विसोरा येथे राहतो. तरुण तडफदार व्यक्तिमत्व. बरेचदा कामासाठी फिरतीवर राहणारा हा तरुण वैदूंच्या संघटनेसाठीही कळकळीने प्रयत्नशील आहे. त्यांनी सांगितले—

'मी वयाच्या १८ वर्षापासून ह्या अभ्यासाला सुरुवात केली. आमच्या घरात वाडवडिलांपासून हे ज्ञान चालत आहे. माझे वडीलही वैद्यकी करतात. मी काही वडिलांपासून व काही आजोबांपासून शिकलो. त्यांच्यामागे लागून सर्व माहिती करून घेतली. गुरांच्या सर्वच रोगांवर उपचार करतो. तिक्या रोगावर (डॉक्टरच्या शब्दात सर्रारोग) पण उपचार करतो. पुष्कळ बैलांना दुरुस्त केले आहे. रोज चार—पाच तरी पेशंट असतात.'

गावातले सांभाळून बाहेरगावी देखील जावे लागते. उपचारासाठी पैसे दिले तर घेतो. डॉक्टरपेक्षा आम्हाला खूपच कमी पैसे मिळतात. लोक स्वतःहून देत नाही.

आमची पैसे मागण्याची आजवर रीत नाही त्यामुळे मागत नाही.

मी फक्त गुरांच्याच रोगावर औषधे देतो असे नव्हे तर मी माणसांच्या रोगांवरपण औषध देतो. त्याचाही अभ्यास केला. ते पण शिक्षण वडिलांकडून, आजोबांकडून घेतले.

वात, घात, गजकर्ण एवढेच काय कॅन्सरवरही. आमच्याच नात्यातील महिलेला गर्भाशयाचा कॅन्सर झाला होता. नागपुरातील डॉक्टरांनी तिला ऑपरेशन करून उपयोग नाही व एका वर्षात मरेल म्हणून परत गावाला पाठवून दिले. तिला औषध देऊन जवळपास ६ वर्षे जिवंत ठेवले.

औषध देताना औषधी काढून आणताना देवाचे नाव घेऊनच काढतो. पोळ्याच्या दिवशी उपवास करतो.

वनस्पती औषधींच्या ज्ञानात अधिक भर घालण्यासाठी वनस्पती औषधांविषयी मिळेल तशी पुस्तक वाचतो. काही नवीन प्रयोग करून पाहतो. कुणाकडून जास्त माहिती मिळाल्यास शिकण्याचे प्रयत्न करतो.


मात्र हाच प्रमुख व्यवसाय नाही. शेती हाच मुख्य व्यवसाय. या धंद्यात पोटापाण्यापुरते पैसे मिळत नाही. लोक देतील तेवढेच आम्ही घेतो. त्यामुळे त्याच्या भरवश्यावर राहता येत नाही. त्यामुळेच औषधाच्या अभ्यासाकडे पूर्ण लक्ष देता येत नाही. इतरांना कोणाला शिकायचे असले तर त्याला शिकवण्याची तयारी आहे.

इतकं सगळं बोलणं झाल्यावर वाटलं सगळीच तर माहिती मिळाली. सहज म्हणून थोड्या गप्पा मारताना त्याची काही चलबिचल जाणवली. त्याला आणखी सांगावसं वाटतं असं वाटलं म्हणून विचारलं आणखी काही सांगायचं आहे ?

'होय ह्या कामात खूप अडचणी पण येतात. तसं तर आम्ही कोण्याच्यात जाऊन कोणाला काही त्रास देत नाही. आपण औषधी आणायची अन बोलावलं तिथं औषधी देऊन रोग्याला दुरुस्त करायचं पण हेही कामानं लोकांना वाईट दिसतो. मीच काही केसेस सरकारी ढोर डॉक्टरसमोर दुरुस्त करून दाखवल्या. त्यांना चांगली त्याची माहिती दिली; पण झालं उलटच माझ्यावरच बिघडले. माझी तक्रार केली की, मी ढोरामध्ये मुद्दाम रोग फैलावतो म्हणून कायदा आमच्यासारख्याच्या बाजूनं नाही. नवीन गावात जाऊन नवीन काही रोगाविषयी प्रयोग करून पाहचला भीती वाटते. तसं तर आम्ही लोक लोकांपर्यंत स्वस्तात औषधी पुरवून सरकारलाच मदत करतो. त्यांचं काम सोपं करतो; पण चोराच्या उलट्या बोंबा म्हणतात तसं आहे. आमच्यावरच दंडूका मारतात.

थोडसं सुन्न झाल्यासारख वाटलं. या व्यवसायतल्या अडचणीची काही कल्पनाच करणं शक्य नाही. वाटलं जंगलातून औषध गोळा करून आणायची आणि लोकांनी मागितली तर द्यायची. पैसे दिले तरी बरे नाही तरी बरे. आपलं काम सतत सुरू ठेवणाऱ्या या निरुपद्रवी माणसाला कशाला काही त्रास होईल; पण सरकारी सेवांचं राजकारण एवढं सरळ नाही. पशुवैद्यक तज्ज्ञाची एक साधासुधा वैदू बरोबरी करणार त्यामुळे यांचे Ego दुखावले जातात ना ! खरं तर लोकांपर्यंत स्वस्त दराने पशुंच्या रोगासाठी औषधी पुरवण्याचं काम सरकार करू शकत नसताना हा गावातला सामान्य माणूस ते काम करतो तेही अत्यल्प दरात त्यासाठी त्याला सरकारकडून काही मदत मिळणं आवश्यक आहे. मदत म्हणून नाही तर त्यांच्या कामाचा गौरव म्हणून ते तर दूरच पण उलट त्याला सरकारी यंत्रणेकडून विनाकारण त्रास दिला जातो. आधीच हे ज्ञान शिकून त्यात अधिक काही करण्याविषयी नवीन पिढीत अनास्था त्यात एखादा कुणी ते करू धजला तर त्यात असंख्य अडचणी आणायच्या. हे ज्ञानाच्या एका क्षेत्राचा गळा घोटणंच नाही का ?

द्वारा, डॉ. सतीश गोगुलवार
मु. पो. कुरखेडा
जि. गडचिरोली, पिन ४४१२०९



# स्त्री - आरोग्यप्रबोधन विषयक चल - शिबीर

सौ. शैलजा देवगांवकर

प्रौढांच्या प्रबोधनामध्ये जाणीव-जागरण आणि त्या द्वारा जीवनोपयोगी कार्यात्मकतेची अभिवृद्धी ह्यांना अतिशय महत्त्व येत आहे. ग्रामीण आणि आदिवासी विभागातील प्रौढांच्या बाबतीत हे कार्य विशेष महत्त्वाचे ठरते. निरंतर शिक्षणाच्या कार्यात आरोग्यविषयक समस्यांची जाणीव तसेच स्वच्छता, सकस आहार, प्रतिबंधात्मक उपाययोजना आणि योग्यवेळी वैद्यकीय इलाज इत्यादींचे महत्त्व समजावून देणे आणि त्यानुसार वैद्यकीय सेवेचा लाभ घेण्यास त्यांना तयार करणे ही आदिवासी जमातींसाठी पहिली बाब ठरते. गडचिरोली जिल्ह्यातील एटापल्ली पंचायत समितीच्या क्षेत्रातील माडिया स्त्रियांच्यासाठी चार माडिया खेड्यांमध्ये अशा प्रकारचे जाणीव-जागरण शिबीर, वरोड्याच्या आदिवासी संशोधन आणि विकास मंडळातर्फे संयोजित करण्यात आले आणि अपेक्षेपेक्षा जास्त प्रतिसाद मिळाला.

शिबिराची पूर्वतयारी म्हणजे या भागातील स्त्रियांना कोणत्या गोष्टींची माहिती सुरुवातीस देणे आवश्यक आहे हे ठरविणे. मंडळाच्या कार्यकर्त्यांना असलेल्या अनुभवाच्या आणि माहितीच्या आधारे सकस आहार, सभोवतालची स्वच्छता आणि मातेचे व बालकाचे आरोग्य याबाबत माहिती देण्याची आवश्यकता आहे असे वाटल्याने या विषयांवर शिबीर घेण्याचे ठरविण्यात आले. माहिती कोणत्या प्रकारची द्यावी हे नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या डॉक्टरांनी निश्चित केलेलेच होते. फक्त त्यात माडिया लोकांच्या गरजेप्रमाणे आवश्यक ते फेरफार करून घेण्यात आले. शिबीर संयोजनाची कल्पना ही विस्ताराच्या कल्पनेवर आधारीत होती. त्यामुळे एका मध्यवर्ती खेड्यांत कार्यक्रम घेऊन भोवतालच्या तीन इतर खेड्यातील माडिया




प्रौढ महिलांना तेथे बोलाविण्यापेक्षा चल-शिबीराची कल्पना स्वीकारण्यात आली व त्याप्रमाणे एटापल्लीपासून तीन ते दहा किलोमीटर अंतरात मोडणाऱ्या जंगलातील कृष्णार, मरपल्ली, वासामुंडी आणि जव्हेली या चार खेड्यांमध्ये लागोपाठ एकेक दिवसांचे शिबीर आयोजित करण्यात आले. शिबिरासाठी तारखा पूर्वनियोजित असल्याने चारही खेड्यांमध्ये तेथील माडियांनी 'पोलो' ( सार्वजनिक सुट्टी ) जाहीर केला होता. सकाळी ९ ते १० च्या सुमारास घरचे कामकाज आटोपून सुमारे २५ ते ६० या खेड्यातील माडिया स्त्रिया शिबिरासाठी एकत्रित होत. बहुतेक शिबीरे 'गोटुल' मध्ये घेण्यात आलीत. या ग्रामामधील माडिय आदिवासींची संख्या ९५ टक्के ते ९८ टक्के असून कुटुंबांची संख्या सुमारे ३० ते ४० च्या दरम्यान होती. या तुलनेत माडिया स्त्रियांची उपस्थिती फारच उल्लेखनीय होती.

स्त्रियांना एकत्र करण्याचे काम त्यांच्यापैकीच काही प्रौढ स्त्रियांनी केले. सकाळी १० ते दुपारी ३ वाजेपर्यंत शिबिराचे कामकाज चाले. त्यात माडिया बोलीतून सोप्या भाषेत माहिती देण्यात येई. जे डॉक्टर माडिया

( पृष्ठ २० वर )

# मागास वर्गीय मुलांच्या शिक्षणातील अडचणी

**मॅक्सीन बर्नसन**




**शाळेत न जाणाऱ्या आणि शाळा लवकर सोडलेल्या मुलांमध्ये मागास वर्गीय मुलांचे मोठे प्रमाण आहे हे सर्वांना माहीत असले तरी, तसे का व्हावे ह्याचा पुरेसा विचार झालेला दिसत नाही. प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकरणाचे उद्दिष्ट आपल्याला पुढे–मागे गाठावयाचे असेल तर ह्या प्रश्नाचा उलगडा करण्याची जरुर आहे.**

या लेखात मांडलेले विचार पश्चिम महाराष्ट्रातील एका तालुक्याच्या गावात आलेल्या माझ्या स्वत:च्या अनुभवावर आधारित असल्यामुळे ते सगळ्या मागासवर्गीय मुलांना लागू पडतीलच असे नव्हे. मोठ्या शहरांतल्या आणि खेड्यांतल्या मागास वर्गीय मुलांची परिस्थिती कितपत निराळी आहे हे मला सांगता येणार नाही. माझी एवढी आशा आहे की ह्या लेखामुळे ह्या मुलांच्या प्राथमिक शिक्षणाच्या प्रश्नाच्या उहापोहाला चालना मिळेल.

ह्या प्रश्नाचे दोन भाग आहेत– शाळा प्रवेश आणि शाळेत टिकणे. गावात स्थायिक झालेल्या बहुसंख्य मागास वर्गीय पालकांना आपल्या मुलांनी शाळेत शिकावे असे वाटते तथापि त्यात काय काय अडचणी येतात ते पाहू

पहिली अडचण म्हणजे की बऱ्याच लोकांजवळ मुलांचे जन्मतारखेचे दाखले नसतात. त्यामुळे आपल्या मुलांना शाळेत प्रवेश घेता येणार नाही. असे त्यांना वाटते. वास्तविक ही अडचण लक्षात घेऊन सरकारने अगदी सोपी पद्धत सुरू केली आहे. त्याप्रमाणे शाळा प्रवेशाच्या अर्जाबरोबर मुलाच्या जन्मतारखेसंबंधी एक प्रतिज्ञा पत्र देता येते. आता तहसिलदारांकडे जाऊन 'ॲफिडेव्हिट' करण्याची जरूरी राहिली नाही. दुर्दवाने ही गोष्ट बऱ्याच लोकांना अजून माहीत नसल्यामुळे एवढ्यासाठी ते आपल्या मुलांना शाळेत घालीत नाहीत.

या नवीन पद्धतीमुळे मुलांना शाळेत दाखल करणे हे अगदी सहजपणे व्हायला पाहिजे पण प्रत्यक्षात तसे घडत नाही. शाळेच्या कार्यालयात आलेल्या पालकांना 'आमच्याकडे फॉर्म नाहीत, तुम्ही परवा या,' 'गुरूजी बाहेर गेलेत, दुपारी या,' असे सांगितले जाते. दोन–तीन हेलपाटे करून आधीच बावरलेले पालक मग निराश होऊन प्रयत्न सोडून देतात.

## फॉर्म मिळाला तर पैसे नसतात

फॉर्म मिळाले, गुरूजी भेटले म्हणजे काम झाले असे ही नाही. काही ठिकाणी इमारत निधीसाठी दोन-चार रुपये मागतात म्हणून खिशात पैसे नसलेल्या पालकांना माघारी जावे लागते, पुष्कळ वेळा वर्गात जागा नाही म्हणून प्रवेश नाकारला जातो. काही वेळा फॉर्म स्वीकारला जातो पण 'मुलाला पंधरा दिवस हजर राहू द्या मग आम्ही त्याला दाखल करून घेऊ.' असे सांगितले जाते

हे सगळे प्रकार केवळ गरीब लोकांची हेटाळणी म्हणून होतात असे नव्हे. शालेय यंत्रणेची अकार्यक्षमता पैशाची कमतरता, मुख्याध्यापकांवरील कामाचा बोजा, वर्गातली प्रचंड गर्दी ह्या सगळ्या गोष्टी थोड्याफार कारणीभूत असतात. तरीपण ही फाटक्या, मळकट कपड्यांतली पोरे एवीतेवी शाळेत नियमितपणे येणारच नाहीत म्हणून त्यांना प्रवेश नाही दिला तर फारसा बिघडत नाही, ही भावना काही मुख्याध्यापकांच्या मनामध्ये असते, हे नाकारता येत नाही. 'अर्थात सगळे मुख्याध्यापक असे असतात असे नव्हे, हेही नमूद केले

पाहिजे. गरीब मुलांना अत्यंत सहानुभूतीने आणि जिव्हाळ्याने वागवणारे मुख्याध्यापकही मी पाहिले आहेत.'

एकदा शाळेत प्रवेश मिळाला की काही मागास वर्गीय मुलांचे शालेय जीवन सुरळीत होते; पण पुष्कळ मुलांना वारंवार होणाऱ्या हकालपट्टीला तोंड द्यावे लागते. पुस्तके नाहीत, पाटी नाही, गणवेश नाही, टोपी नाही, हात-पाय-केस अस्वच्छ आहेत, मूल काही दिवस गैरहजर होते, त्याचा अभ्यास झाला नाही अशा अनेक कारणांनी शिक्षक त्यांना घरी पाठवून देतात. शिवाय ज्या मुलांना दाखल न करता बसवून घेतले होते त्यांना काही दिवसानंतर पटावर नाव नसल्यामुळे हाकलून दिले जाते आणि जास्त दिवस गैरहजर असलेल्या मुलांची नावे पटावरून कमी केली जातात.

हे झाले शिक्षकांच्या बाबतीत. मग मुलांची भूमिका काय ? ह्या सगळ्या मुलांना शाळेत जाण्याची तीव्र इच्छा असतेच असे नाही. शाळेत बसण्यापेक्षा पतंग उडवणे, गोट्या खेळणे, गावभर हिंडणे ह्या गोष्टी त्यांना कितीतरी जास्त आकर्षक वाटतात. हे मात्र आठ-नऊ वर्षांच्या मुलांना लागू आहे. सहा वर्षांची बहुतेक मुले मुकाट्याने शाळेत जायला तयार असतात आणि वर्षभर बालवाडीत गेलेल्या मुलांना तर शाळेबद्दल उत्सुकता असते; पण त्या वयात मुले शाळेत नाही गेली आणि हिंडण्याची-फिरण्याची सवय लागली तर नंतर त्यांच्या मनात शाळेची गोडी निर्माण करणे हे महाकठीण काम आहे.

## शाळेतील शिक्षेची भीति

बाहेर आकर्षक जग असताना वर्गात मात्र आकर्षण वाटावे म्हणून फारसे काही नसते. गर्दी जास्त असल्याने शिक्षकांचे लक्ष शिकवण्यापेक्षा मुलांवर नियंत्रण करण्याकडे जास्त असते. काही ठिकाणी शिस्तीची कल्पना विलक्षण असते. त्यामुळे शिक्षकाकडून बोलणे किंवा मार खाल्ला की मूल शाळेत परत जायला तयार होत नाही हे साहजिक आहे.

अर्थात मुलांना नियमितपणे शाळेत पाठवणे, त्यांची किमान स्वच्छता ठेवणे हे पालकांचे कर्तव्य आहे. मग पालक एवढे का करीत नाहीत ? पहिली गोष्ट कबूल करावी लागते की जरी त्यांना मुलांना शाळेत पाठवण्याची इच्छा असली तरी त्यासाठी लागणारी शिस्त आणि नियमितपणा पुष्कळ पालकांच्यात नसतो त्यामुळे ते किरकोळ कारणांसाठी अधूनमधून मुलांना घरी ठेवतात.

ह्या शिवाय मात्र पुष्कळ पालकांच्या खऱ्या अडचणी असतात. आईवडील दोघे लवकर कामावर जातात म्हणून मूल शाळेत जाते की नाही हे बघायला कोणी घरी नसते. पुष्कळ वेळा झोपडीला कुलूप नसल्याने मोठी माणसे बाहेर गेली की घर बघायला मुलाला घरी जावे लागते.

वरील विवेचनावरून असे दिसून येते की मागास वर्गीय मुलांचा शालेय प्रवेश आणि गळतीचा प्रश्न इतर सामाजिक आणि आर्थिक प्रश्नांमध्ये गुंतलेला असल्यामुळे तो सोडवणे फार अवघड आहे. काही झाले तरी गरीबी आणि त्याबरोबर येणाऱ्या समस्या काही पाच-सहा वर्षांत हटणार नाहीत आणि १९९० पर्यंत प्राथमिक शिक्षणाची सार्वत्रिकरणाचे ध्येय सरकारने घोषित केले तरी त्याची पूर्तता होण्याची सूतराम शक्यता नाही. तरीपण काही गोष्टी करता येतात आणि सरकार त्या दिशेने पावले टाकीत आहे ही स्वागतार्ह गोष्ट आहे. शालेय इमारती बांधण्याचा धडक कार्यक्रम हाती घेणे. गट उपस्थिती अधिकारी नेमणे. पूर्व प्राथमिक शिक्षण प्राथमिक शिक्षणाचा अविभाज्य भाग समजणे ह्या शालेय सुधार समितीने केलेल्या शिफारशी अमलात आणल्या तर मागासवर्गीय मुलांचे प्रश्न निश्चितपणे काही प्रमाणात सुटतील.

## ज्यादा शिक्षक हवेत


ह्या बरोबर आणखी काही गोष्टी करण्याची आवश्यकता आहे. एकतर प्राथमिक शिक्षकांच्या संख्येत मोठी वाढ करायला पाहिजे. त्या शिवाय मुलांना शाळेत दाखल करण्याची पद्धत लोकांना समजावून सांगण्यासाठी एक जनसंपर्क मोहीम सरकारने हाती घेतली पाहिजे. त्याबरोबर शाळेच्या प्रवेशासाठी लागणारे फॉर्म मोठ्या प्रमाणावर उपलब्ध करून घ्यावे लागतील आणि प्रत्येक शाळेमध्ये दिवसभर ते फॉर्म स्वीकारायला कोणीतरी अधिकारी आहे ह्याची दक्षता घ्यावी लागेल.

मुलांना शाळेत टिकवण्यासाठी गणवेशाची पद्धत एकदम बंद करणे इष्ट ठरेल. तसेच किमान उपस्थितीच्या नियमाचा फेरविचार करायला पाहिजे आणि

**( पुढील मजकूर पान १४ वर )**

# आदिवासी मुलांसाठी अनौपचारिक शिक्षण प्रकल्प

कमल पाध्ये



आंतरराष्ट्रीय बालकवर्षात समाजातील मागास-वर्गाच्या जमातीच्या मुलांसाठी शैक्षणिक कार्य सुरू करावे या हेतुने समाजवादी महिला सेनेने आदिवासी जमातीच्या मुलांच्या शिक्षणविषयक समस्यांचा अभ्यास करण्याचे योजिले. त्यासाठी महाराष्ट्रातील १९ टक्के वस्ती असलेल्या आणि डोंगर व अरण्यांनी वेढलेल्या ठाणे जिल्ह्याच्या पूर्व भागातील आदिवासींची १९७७ साली एक पहाणी करण्यात आली. पुण्याच्या भारतीय शिक्षण संस्थेने पहाणीचा तक्ता तयार करून दिला. यानुसार पालघर तालुक्यातील ३२० आदिवासी कुटुंबांची पहाणी करण्यात आली आणि त्यातील निष्कर्षानुसार ६ ते १४ वर्षे वयाच्या आदिवासी मुलांसाठी अनौपचारिक शिक्षणाचा एक प्रकल्प तयार करण्यात आला.

पहाणीत असे आढळून आले की बहुसंख्य आदिवासी मुले जिल्हा परिषदेच्या शाळेत जात नाहीत. ही मुले शाळेत का जात नाहीत याचा शोध घेतला तेव्हा त्याची कारणे पुढीलप्रमाणे दिसून आली. १) अत्यंत दारिद्र्यामुळे शाळेत जाण्यास मुलांकडे कपडे नाहीत. २) बाळगी म्हणून इतरांकडे राहिल्यास एक वेळचे जेवण मिळते त्यामुळे शाळेची वेळ जमत नाही. ३) आई-वडील उपजिविकेचे साधन म्हणून जंगलात लाकडे तोडण्यास किंवा शेतावर मजूर म्हणून कामावर गेल्यावर लहान भावंडांना सांभाळण्यासाठी घरी राहणे आवश्यक असते. ४) प्रमाणभाषेतील व बोलीभाषेतील फरकामुळे क्रमिक पुस्तकांतील भाषा समजत नाही. विषयांचे आकलन होत नाही आणि त्यामुळे शिक्षणात रस निर्माण होत नाही.

## पाळणाघरांची गरज

आदिवासी मुलांच्या शिक्षणातील या अडचणीवर उपाययोजना केल्याशिवाय या परिसरांत खऱ्या अर्थाने शिक्षणाचे कार्य सुरू करणे शक्य नव्हते. ६ ते १४ वर्षाच्या मुलांना शिकवावयाचे असेल तर प्रथम त्यांच्या लहान भावंडांचीही सोय करणे आवश्यक होते म्हणून अनौपचारिक शिक्षण वर्गांबरोबर बालवाड्या आणि पाळणाघरेही चालविण्याचा निर्णय घेण्यात आला. म्हणून आदिवासी सहज शिक्षणाच्या केंद्रांत पाळणाघर, बालवाडी व ६ ते १४ वर्षे वयाच्या मुलांसाठी शिक्षण अशी योजना केली गेली. ही व्यवस्था कोसबाड येथे श्रीमती ताराबाई मोडक यांनी सुरू केलेल्या व सध्या ते कार्य करीत असलेल्या श्रीमती अनुताई वाघ यांच्या 'विकासवाडी' या कल्पनेवर आधारलेली असली तरी प्राथमिक शिक्षणाची पद्धती मात्र भारतीय शिक्षण संस्थेच्या मार्गदर्शनाखाली सुरू करण्याचे ठरले.

लहान भावंडांसकट सर्व मुलांची केंद्रात सोय झाली तरी कपडे व नास्ता यांची व्यवस्था करणे जरूर होते. नास्ता मिळतो म्हणून मुले शाळेत येतात असा प्रवाद पत्करावा लागला तरी चालेल; परंतु कुटुंबाच्या परिस्थितीचा विचार करणे महत्त्वाचे आहे. या विचाराने नास्त्याची सोय करण्यात आली. जीवनाच्या प्राथमिक गरजा भागविल्याशिवाय शिक्षण, संस्कार व सुधारणा या गोष्टी बोलायच्याच राहतील आणि त्या तशा राहू नयेत यासाठी आमचा प्रयत्न होता. स्वतःच्या कुटुंबाच्या प्राथमिक गरजा पुरवण्यात सर्व जन्म खर्ची घालणाऱ्या आणि तरीही अनेक उपास घडणाऱ्या अशिक्षित, अज्ञ आईबापांच्या मुलांना शिक्षणाचे संस्कार देण्याचा आणि

शिक्षण घेण्यात रस निर्माण करण्याचा आमचा प्रयत्न होता. हे फार कष्टाचे व जिकिरीचे काम आहे याची जाणीव होती; परंतु कार्य निश्चित केल्यानंतर होणारे कष्ट आणि येणारे प्रवाद सहन करण्याची आमची तयारी होती आणि म्हणून मुलांच्या एक वेळच्या जेवणाखाण्याची व्यवस्था केंद्रात करण्यात आली. कपडयांचीही थोडया फार मोठ्या प्रमाणात व्यवस्था झाली.

## दडपणाशिवाय शिक्षण

मुले जेव्हा परिषदेच्या शाळेत न जाण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे त्यांना शिकवलेले समजत नसे. या दृष्टीने आम्ही अनौपचारिक शिक्षण पद्धतीचा अवलंब करण्याचे ठरवले. मुलांच्या परिसरातील साहित्याच्या सहाय्याने हासत खेळत शिक्षण या पायावर ही शिक्षणपद्धती उभारलेली आहे. त्यासाठी मुलांच्या मनात शिक्षिकांबद्दल भीती असता कामा नये, निर्भयतेने हे शिक्षण त्यांना घेता आले पाहिजे तरच ते हासत खेळत शिकू शकतील या दृष्टीने शिक्षण व विद्यार्थी यांच्यात खेळीमेळी, प्रेमभाव व सहभावना निर्माण झाली पाहिजे. वर्गरचनेपासून जुन्या पारंपारिक अनेक गोष्टी या पद्धतीत बदलाव्या लागतात. थोडक्यात म्हणजे दडपणाशिवाय जे शिक्षण दिले जाते ते अनौचारिक शिक्षण होय.

खूप गप्पा मारताना भाषा शिकणे, वस्तूंच्या सहाय्याने गणित शिकणे आणि त्यासाठी परिसरातील साहित्याचा वापर करणे ही या पद्धतीत महत्त्वाची बाब आहे. परिचयातील शब्दांचा उपयोग करून भाषा शिकवली पाहिजे. आदिवासींच्या बोलीभाषेतील शब्द घेऊन त्यांच्या सहाय्याने प्रमाणभाषेतील शब्दांपर्यंत पोचले पाहिजे. भाषा ही अर्थवाही आहे हा नियम लक्षात घेऊन शिकवले पाहिजे. ग, म, भ, न या अक्षरांना अर्थ नाही म्हणून ती भाषा नव्हे. अनौपचारिक पद्धतीत शब्दांकडून अक्षरांकडे जायला पाहिजे अक्षरांकडून शब्दांकडे नव्हे, तसेच वस्तूशिवाय गणिताला अर्थ नाही म्हणून मोजणे मापणे या कल्पना वस्तू दाखवून शिकवल्यास अधिक सुलभ होतात या विचाराने तसे साहित्य बनवून मुलांना शिकवणे आवश्यक आहे.

या सर्व पद्धतीला मुलांचा प्रतिसाद कसा मिळतो या दृष्टीने येणाऱ्या अनुभवातून आम्ही आमच्या वाटचालीत सुधारणा करण्याचे ठरवून काम सुरू केले.

आमचे पहिले केंद्र १९७८ च्या जूनपासून मासवण येथे सुरू झाले. हे केंद्र पालघरपासून सुमारे १३ किलोमिटरवर पालघर मनोर रस्त्यावर आहे. १९७८ च्या डिसेंबरपर्यंत या परिसरांत आम्ही एकंदर दहा केंद्रे उघडली. ती पुढीलप्रमाणे आहेत— १) मासवण—कोळीपाडा, २) मासवण—पाटीलपाडा, ३) धुकटण—जाधवपाडा- ४) धुकटण—बोडणपाडा, ५) वेऊर, ६) चहाडे, ७) कोकणेर, ७) खरशेत, ९) वांदिवली व १०) नांदगाव.

या सर्व केंद्रात पाळणाघर, बालवाडी व अनौपचारिक शिक्षण वर्ग मिळून सुमारे ५०० ते ५५० मुले येऊ लागली. त्यांच्यासाठी एक बालवाडी प्रशिक्षित शिक्षिका, एक मदतनीस व एक आया अशा तीन स्त्रियांची प्रत्येक केंद्रावर नेमणूक करण्यात आली.

मासवणचे केन्द्र उघडल्यावर आलेले मुलांचे अनुभव शिक्षणाच्या अनेक किल्ल्या हातात देऊन गेले. आदिवासी मुलांच्या परिस्थितीचे व दडपलेल्या मनाचे बोलके दर्शनही झाले. बालवाडीच्या मुलांसाठी आणलेली खेळणी मुलांच्या समोर टाकली. त्यांना खेळावयास सांगितले. परंतु खेळणी बघून त्याचे डोळे लकाकले तरी ती खेळण्यांना हात लावावयास धजत नव्हती. स्पर्श हा तर मानवी मनाच्या विविध भावनांचा प्रकट अविष्कार. आणि अतिशय संवेदनाशील बालमनाला प्रत्येक गोष्टीचा स्पर्श अनुभवण्याची तीव्र इच्छा असतेच. पण प्रत्यक्षात ही मुले भयचकित नजरेने खेळण्यांकडे नुसती पहात होती. त्यांना स्पर्श करीत नव्हती. दारिद्र्यात जीवन जगणाऱ्या वंचित मनाला ही खेळणी आपल्यासाठी आहेत हेच पटत नव्हते ती भांबावून गेली होती. त्यांना निर्भय बनवायला हवे होते. हासते खेळते बनवायला हवे होते. अनौपाचारिक शिक्षण पद्धतीची ती आवश्यक अट होती.

दडपलेल्या मनाचा असा अनुभव येत असतानाच जाणवले की ही मुले फारशी बोलतच नाहीत. मोठी माणसेही बोलत नाहीत एक प्रश्न दहादा विचारला तरी तोंडातून शब्द काढीत नाहीत. असे का ?

## अपुरे शब्दभांडार

आणि याच्या उत्तरातच अभ्यासक्रमाची आणखी

एक किल्ली सापडली. यांचा शब्दकोश फार मर्यादित आहे. गरजेपुरता आहे. विचारांनी त्यांचे शब्द भांडार वाढलेले नाही. मुलांना बोलते करणारे कुतुहल व जिज्ञासाच दडपली गेली आहे. तेथे प्रश्न विचारणे कुठून येणार ? म्हणून या मुलांना खूप बोलके करणे हाच येथील शिक्षणाचा प्रारंभ ठरला. बोलणे, वाचणे, गाणी गोष्टी ह्या पायावर शिक्षणाची उभारणी करणे आवश्यक वाटले. पाटचा पुस्तके बाद ठरली.

पण पालकांना कुठले हे पटायला ? बाळाला थोडयाच महिन्यात वाचायला आले यापेक्षा त्याच्या लिहायला न येण्याबद्दल तक्रारी होऊ लागल्या. त्यांना समजावून सांगणे हे पालकसभेचे काम ठरले.

अनौपचारिक पद्धतीने शिक्षणाला सुरुवात झाली तरी अनुभवांनी आम्ही बऱ्याच गोष्टी शिकत होतो. अनौपचारिक पद्धतीने मुलांना शिकवून जिल्हा परिषदेच्या पहिली दुसरी वगैरेच्या परिक्षांना बसवावयाचे असे आम्ही ठरवले होते. याचा अर्थ मूळ औपचारिक शिक्षणक्रम डोळ्यासमोर तसाच ठेवला होता. शिकवण्याची पद्धती बदलली होती. परिक्षा पद्धती महत्वाची ही धारणा तशीच राहिल्यामुळे शिक्षिकाही जुन्या पठडीच्या पारंपारिक पद्धतीने मुलांचा अभ्यासक्रम घेऊ लागल्या. औपचारिक शिक्षण पद्धतीच थोडयाफार प्रमाणात सुरू राहिली.

यावर विचार विनिमय झाला. अनौपचारिक पद्धती व औपचारिक शिक्षण पद्धती यातील समन्वय साधावा असे वाटू लागले. अनौपचारिक पद्धतीला सरकारी मान्यता असली तरी जनमानसात त्याबद्दल विश्वास नव्हता. उच्च शिक्षणाची किंवा सरकारी नोकऱ्या करण्याची इच्छा असणाऱ्यांना औपचारिक शिक्षण घेणे व पदव्या मिळवणे आवश्यकच होते. अशा वेळी मार्ग काढण्याच्या दृष्टीने परिक्षा देण्यात रस असलेल्या मुलांना एकदम चवथीच्या परिक्षेला बसता यावे म्हणून परिक्षेआधी दोन महिने त्यांची तयारी करून घ्यावी असे ठरवले. अनौपचारिक पद्धतीने चवथीपर्यंत शिक्षण घेऊनही ही परिक्षा सुलभ होईल असा विश्वास वाटत होता. या व्यवस्थेनंतर खऱ्या अर्थाने अनौपचारिक शिक्षण पद्धती सुरू झाली.

## पैशाला दुय्यम महत्त्व

तरीही प्रत्यक्षात आणखी एक अडचण निर्माण झाली नेमलेल्या शिक्षिका जुन्या औपचारिक पद्धतीने शिकलेल्या होत्या. त्यांना दोन दृष्टींनी घडवणे आवश्यक होते. एक म्हणजे जुनी पारंपारिक पद्धती सोडून नवी पद्धती अमलात आणण्याचे शिक्षण देणे आणि दुसरे म्हणजे समाजकार्य म्हणून या कार्यात रस घेणे. केवळ पैशाकडे लक्ष ठेऊन ही पद्धती यशस्वी होऊ शकणार नव्हती. शिक्षकाचा सहभाग खेळीमेळीचा होण्यासाठी शिक्षक व मुले यांचे संबंध पूर्वीच्या पंतोजी पद्धतीचे असणे घातक होते. या दृष्टीने शिक्षिकांची शिबिरे घेतली गेली. अनेक वेळा त्यांना मार्गदर्शन केले गेले. यासाठी भारतीय शिक्षण संस्थेचे मोलाचे सहाय्य झाले.

या शिक्षण पद्धतीत केवळ शालेय शिक्षणाबद्दल विचार करून आम्ही थांबलो नाही. या परिसरात शिरणाऱ्या कुणालाच तसे थांबता येणार नाही. १९७८ साली प्रथमच आम्ही येथे प्रकल्प सुरू केला तेव्हा जाणवला तो आरोग्याचा अभाव. तान्ही मुले गुटगुटीत तर ३–४ वर्षापासूनची मुले खरजेने लडबडलेली. बहुतेक सर्व मुले लंगडत कुथत शाळेत आलेली. त्यांना औषधोपचार करणे आणि स्वच्छतेच्या सवयी लावणे हे फार महत्वाचे कार्य होते. पोटाचे नगारे तपासताना जंत विकार व आव पडणे हे रोग सर्वांचे दोस्त असल्याचे दिसून आले होते. या दृष्टीने परिसरात चाललेल्या आदिवासी केन्द्राची मदत घेतली परंतु फारसा उपयोग झाला नाही. अधिक कडक उपाय, सततची काळजी आणि स्वच्छता यांच्यावर भर देऊन व सतत वैद्यकीय तपासणी करून या रोगापासून त्यांना मुक्त करण्याचे ठरवले. स्वच्छतेच्या व आरोग्याच्या सवयीचे शिक्षण देणे हा शिक्षणक्रमाचाच एक भाग बनला. वैद्यकीय तपासणी व औषधोपचार हेही कार्याचे अविभाज्य घटक बनले. आज आम्ही अभिमानाने असे म्हणू शकतो की सततच्या उपचारांनी आमच्या केन्द्रात येणाऱ्या ९९ टक्के मुलांची खरुज नाहीशी झाली आहे.

केवळ अनौपचारिक शिक्षण देऊन समाजवादी महिला सभेचे स्त्री जागृतीचे स्वप्न साकार होणार नव्हते. त्यासाठी आदिवासीत अधिक व्यापक उदिष्टांनी कार्य करणे आवश्यक होते. म्हणून आम्ही आदिवासी सहज शिक्षण परिवार नावाची संस्था १९७९ मध्ये स्थापन केली होती. शिक्षण प्रकल्पात तिचे संपूर्ण सहाय्य होते. शिवाय प्रौढ शिक्षण वर्ग, बेकरी, स्त्रियांची शिबिरे, बांबू व वेत कामाचे वर्ग चालवणे अशी बरीच

लोकोपयोगी व लोकशिक्षणाची कामे या संस्थेमार्फत होत आहेत.

प्रकल्प प्रायोगिक पायावर सुरू केला असल्याने प्रत्यक्ष अनुभवातून त्यात अनेक वेळा बदल करावे लागले. या सर्व प्रयोगातून व अनुभवातून एक नवी अनौपचारिक शिक्षण पद्धती तयार झाली.



## विद्यार्थ्यांच्या अडचणी

( पृष्ठ १० वरून )

सबळ कारणाशिवाय मुलांना घरी पाठवणाऱ्या शिक्षकांना कडक इशारा दिला पाहिजे. ह्याशिवाय पहिलीच्या इयत्तेत जरी पुस्तके नसलेल्या मुलांचे नडू नये म्हणून बालभारतीच्या वाक्यांचे फलक शिक्षकांना पुरवले पाहिजेत.

अर्थात जोपर्यंत शाळेच्या अधिकाऱ्यांना आणि शिक्षकांना मागास वर्गीय मुलांबद्दल आत्मियता वाटत नाही तोपर्यंत ह्या मुलांना शाळेबद्दल गोडी फारशी वाटणार नाही आणि आत्मियता ही गोष्ट सरकारी आदेशाने निर्माण करता येत नाही. तरीपण वर्गातील गर्दी कमी केली आणि शिक्षकांना काही शैक्षणिक साधने पुरवली तर वर्गातले वातावरण सुधारेल आणि शिक्षकांच्या व मुलांच्यामध्ये थोडीफार जवळीक निर्माण होईल.

ही मात्र दीर्घ प्रक्रिया आहे; परंतु गणवेशाची पद्धत बंद करणे, जाचक नियम बदलणे ह्यासारख्या साध्या गोष्टी लगेच करता येतील. मागास वर्गीय मुलांना आपल्याला प्रेम देता येत नसले तर निदान त्यांच्या शाळेच्या वाटेतल्या अडचणी काही अंशी कमी करता येतील.

वृत्तविशेष

## वेठबिगारांचे पुनर्वसन

**ठाणे** : ठाणे जिल्ह्याच्या वसई तालुक्यातील २६ वेठबिगारांना ( २२ कुटुंबे ) कणेर येथे वेठबिगारांचे पुनर्वसन योजनेनुसार घरकुले बांधून देण्यात आली आहेत. ठाणे जिल्हाधिकारी डॉ. सौ. जॉयन शंकरन् यांनी ही माहिती दिली.

ठाणे जिल्ह्यात डिसेंबर ८० अखेर पालघर तालुका २२९, वसई तालुका ३२५, वाडा तालुका २६, भिवंडी तालुका ४ व जव्हार तालुका ४ याप्रमाणे एकूण ५७८ वेठबिगार असल्याचे आढळून आल्याचे त्यांनी सांगितले.

एकात्मिक ग्रामीण विकास योजनेंतर्गत अनुदान व वेठबिगार अनुदान अर्थसहाय्य योजनेखाली डिसेंबर ८४ अखेर वसई तालुक्यातील १२० वेठबिगारांना २,००,६४० रुपये व पालघर तालुक्यातील ५५ वेठबिगारांना २,५३,३१८ याप्रमाणे एकूण ४,५३,९५८ रुपये, बैलजोडी, बैलगाडी, शेळ्या-मेंढ्या अनुदान देण्यात आलेले आहे.

पालघर तालुक्यातील खुटल येथे २ एकर जमिनीत वेठबिगारांची सहकारी वीट उत्पादक संस्था स्थापन करण्यात आली असून त्यात ७१ वेठबिगार सभासद झाले आहेत. सदर जमीन शासनाने दिली असून तेथे लवकरच वीट उत्पादनास प्रारंभ होईल असेही जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले. ❋

## हा तर शासनाचा नाकर्तेपणा

**पुणे** : महाराष्ट्रात सुमारे १ लाख वेठबिगार असताना सरकारला फक्त २७५ वेठबिगारच मिळावेत हा शासनाचा नाकर्तेपणा आहे असे शेतमजूर व रोजगार हमी कामगार समन्वय समितीचे नियंत्रक बा. न. राजहंस व संतराम पाटील यांनी म्हटले आहे.

शेतमजूर व रोजगार हमी कामगारांना निर्देशांकाशी जोडलेले किमान वेतन मिळावे. दलित आदिवासींच्या हस्तांतरीत जमिनी परत मिळाव्यात या व इतर मागण्यांसाठी येत्या ५ फेब्रुवारीला महाराष्ट्रात १ लाख लोकांचे जेल भरो आंदोलन संघटित करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. ❋

# आदिवासी बोलीभाषा प्रकल्प

सुनीता ज. जोशी

शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचे उद्दिष्ट, महाराष्ट्राच्या विकसित विभागाप्रमाणेच, डोंगराळ भागात राहणाऱ्या विविध आदिवासी लोकसमुहातील विद्यार्थ्यांच्या बाबतीतही परिणामकारकपणे सफल व्हावे हा या प्रकल्पाचा मुख्य उद्देश आहे. प्राथमिक शिक्षणाच्या प्रारंभ कालात जर आदिवासी मुलांना त्यांच्या मातृबोलीतून शिक्षण मिळाले आणि क्रमशः या शैक्षणिक संस्काराचा सांधा मराठी या प्रादेशिक भाषेशी जोडता आला तर श्रवण, भाषण–संभाषण, वाचन व लेखन ही भाषिक कौशल्ये आदिवासी मुले अधिक चांगल्याप्रकारे आत्मसात करू शकतील. तसे झाले तर त्यांची समज, आकलनशक्ती आणि अभिव्यक्ती सुधारेल. त्यामुळे या आदिवासी मुलांना अध्ययनात रस निर्माण होईल, गोडी उत्पन्न होईल. यामुळे आदिवासी मुलांच्या संदर्भातील प्राथमिक स्तरावरील गळतीचे प्रमाण कमी होईल. ही या प्रकल्पामागील प्रमुख शैक्षणिक भूमिका आहे.

आदिवासी लोकसमूह आणि मराठी भाषिक लोक यामध्ये भाषिक दळणवळण प्रस्थापित व्हावे, आदिवासी भाषा, संस्कृती, लोकजीवन समजून घेण्यातील भाषिक अडथळे दूर व्हावेत आणि आदिवासी भागात काम करणारे शिक्षक, कार्यकर्ते, कर्मचारी, अधिकारी इत्यादींना आदिवासी बांधवांशी संपर्क आणि जवळीक साधणे शक्य व्हावे, त्यामुळे परस्परविश्वास संपादन व्हावा आणि विविध विकास योजनांचे आकलन व उपयोग आदिवासी नागरिकांना अधिक परिणामकारकरीतीने करता यावा, म्हणजेच एकूण आदिवासी विकास कार्यक्रमातील भाषिक अडथळे दूर होऊन आदिवासींच्या शैक्षणिक व सामाजिक प्रगतीस हातभार लागावा ही या प्रकल्पाची व्यापक उद्दिष्टे म्हणता येतील.


भारतीय इतिहास आणि संस्कृती यांच्या आदिकाळापासून ज्यांचे वास्तव्य आहे ते आदिवासी होत. भारतीय घटनेप्रमाणे त्यांचा समावेश अनुसूचित जमाती, जनजाती यामध्ये होतो. सामाजिकदृष्ट्या अनेक कुळे एकत्र येऊन या जमाती तयार झाल्या आहेत. आदिवासी भाषांना प्रमाणित भाषा, लिखित भाषा असे स्वरूप आलेले नाही. तर त्या बोलीभाषा आहेत. १९८१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रात एकूण ४७ आदिवासी



आम्ही पुस्तक वाचत नाही,



आम्ही लीहण जाणत नाही



मग आम्ही शहाण्यासारखे
बोलणार कसे.

जमाती असून त्यांची लोकसंख्या ५७.७२ लाख आहे. महाराष्ट्राच्या एकूण लोकसंख्येशी हे प्रमाण ९ टक्के आहे.

भाषाशास्त्रदृष्टद्या महाराष्ट्रातील आदिवासी बोलींचे सर्वसाधारणपणे तीन वर्ग पडतात– १) भारतीय आर्य-कुलातील बोली. उदा.– वारली. मराठी ही प्रादेशिक भाषा याच कुलातील असून वारली ही तिची बोली आहे. २) द्राविड कुलातील बोली– उदा कोलामी ३) दक्षिण आशियाई (ऑस्ट्रोएशियाटिक) बोली– उदा. कोरकू, नहाली.

महाराष्ट्रशासनाने प्रारंभी मध्यवर्ती भारतीय भाषा संस्था, म्हैसूर या संस्थेच्या सहकार्याने १९७५ मध्ये ‘आदिवासी बोलीभाषा प्रकल्प’ कार्यान्वित केला आणि त्याची जबाबदारी शिक्षणशास्त्र संस्था, पुणे या संस्थेकडे सोपवली. आधुनिक वैज्ञानिक पद्धतीच्या भाषाशास्त्रीय विश्लेषणावर आधारित शैक्षणिक साधन–सामग्री तयार करणे हे या प्रकल्पातर्गत पहिले उद्दिष्ट ठरविण्यात आले. प्रारंभी वारली (ठाणे), कोलामी (यवतमाळ व नांदेड) आणि माडिया–गोंडी (गडचिरोली व चंद्रपूर) या बोलींवर कार्य सुरू झाले. महाराष्ट्रातील आदिवासींपैकी माडिया–गोंडी या सर्वांत मोठ्या समूहाच्या संदर्भात कार्य केंद्रित करण्यात यावे असे नंतर ठरविण्यात आले. आत्तापर्यंत शिक्षणशास्त्र-संस्थेने या प्रकल्पांतर्गत पुढील पुस्तके प्रकाशित केली आहेत.

**वारली बोली** :

१) वारली शब्दकोश : वारली–मराठी, मराठी–वारली

२) मी रामासी बोलं : (वारली व्याकरण)

३) रामराम कसाक ? : वारली परिचय पुस्तिका

**कोलामी बोली** :

१) आदिभारती : कोलामी, पुस्तक पेहले.

२) शिक्षकांसाठी हस्तपुस्तिका

३) कोलामी कारापेंग – कोलामी व्याकरण

४) कोलामी शब्दकोश : कोलामी–मराठी, मराठी–कोलामी

माडिया–गोंडी बोलीभाषेवर कार्य केंद्रित करण्याच्या निर्णयामध्ये बालवाडी स्तरावरील मुलांकरिता शैक्षणिक साहित्य तयार करावे, पहिल्या इयत्तेतील मुलांकरिता वाचन–पुस्तिका तयार करण्यात यावी व या वाचन–पुस्तिकेचा वर्गात शिक्षकांना परिणामकारकपणे उपयोग करता यावा म्हणून शिक्षकांसाठी हस्तपुस्तिका तयार करण्यात यावे असे ठरविण्यात आले. त्यानुसार पुढील पुस्तके तयार करण्यात आली–

१) बालवाडी – माडिया–गोंडी

२) आदिभारती – माडिया गोंडी

३) शिक्षकांसाठी हस्तपुस्तिका

या पुस्तकांचे अध्ययन करता मराठी या प्रादेशिक भाषेचा परिचय व्हावा आणि शिक्षकांना त्यांच्या अध्यापनात आदिवासी बोलीचे स्वरूप परिचित यादृष्टीने या पुस्तकात बोलीभाषेतील मजकूराबरोबरच त्याचे मराठी भाषांतरही दिले आहे. त्यामुळे आदिवासी बोली व प्रादेशिक भाषा–मराठी यांचा सांधा जुळला जाईल आणि एकूण अध्ययन–अध्यापन प्रक्रिया सुलभ होईल अशी अपेक्षा आहे.

या भूमिकेतूनच आदिवासी बोलीतून पुस्तके तयार करताना देवनागरी लिपीचाच स्वीकार करण्यात आलेला आहे.

ही पुस्तके तयार करत असताना संबंधित आदिवासी विभागात प्रदीर्घ क्षेत्रीय कार्य करण्यात आले. आदिवासी स्त्रिया, पुरुष, मुले, शिक्षक व इतर संबंधितांशी संपर्क साधण्यात आला, त्याचप्रमाणे आदिवासी मुलांना त्यांच्या सभोवताली दिसणारी भौगोलिक परिस्थिती, निसर्ग, लोकजीवन यांच्याशी संवादी असे शब्द, वाक्यरचना, गोष्टी, गाणी यांचा उपयोग करण्यात आला आहे. त्यामुळे बोलीभाषा, प्रादेशिकभाषा यांचे अध्ययन–अध्यापन होत असताना मुलांना व शिक्षकांना संवादी स्वरूपाचे सांस्कृतिक वातावरण लाभेल अशी अपेक्षा आहे. त्यानुसारच मूळाक्षरे – त्यांचा परिचय, अंकपरिचय, रंगांची ओळख, पशुपक्ष्यांची ओळख इ. संदर्भात शब्दयोजना, चित्रांचा वापर करण्यात आला आहे.

ही पुस्तके आणि शिक्षकांसाठी हस्तपुस्तिका यांचा त्या भागातील शिक्षकांना परिचय व्हावा, त्यांचे उपयोजन योग्यरीतीने करता यावे यासाठी गडचिरोली विभागातील संबंधित शिक्षकांसाठी प्रशिक्षण वर्ग आयोजित करण्यात आले आहेत. प्रत्यक्ष ही पुस्तके बालवाडीच्या व इयत्ता पहिलीच्या स्तरावर उपयोगात आणली जातील आणि त्यानुसार पुढील अनुधावन व मूल्यमापन इ. कार्ये पूर्ण होतील.

प्रकल्पाचे कार्ययोजन आणि मार्गदर्शन याकरता प्रारंभापासून प्रकल्प सल्लागार मंडळ कार्य करीत आहे. त्यामध्ये शिक्षणशास्त्रसंस्थेचे संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे या संस्थेचे संचालक तसेच डेक्कन कॉलेजमधील दोन भाषातज्ज्ञ, आदिवासी–बोलीभाषा विभाग प्रमुख यांचा समावेश आहे.

या प्रकल्पाची भूमिका आणि दृष्टीकोन विख्यात भाषाशास्त्रज्ञ डॉ. अशोक रा. केळकर यांच्या 'आदिवासींच्या प्रश्नांची भाषिक बाजू' (समाजप्रबोधन पत्रिका, मे–जून–१९७२) या लेखात व्यक्त झाली आहे.

सध्या डॉ. केळकर व डॉ. राव हे डेक्कन कॉलेजमधील भाषातज्ज्ञ, डॉ. गारे, संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था आणि शिक्षणशास्त्रसंस्थेचे संचालक श्री. का. पा. सोनवणे सल्लागार मंडळावर आहेत.

या प्रकल्पाचे आजपर्यंतचे एकूण कार्य अनेक भाषातज्ज्ञांनी केलेले क्षेत्रीय कार्य, अभ्यास, संशोधन यातून साकार झाले आहे.

प्रकल्पांतर्गत तयार करण्यात आलेले शैक्षणिक साहित्य, त्यांचा शालेय स्तरावर प्रत्यक्ष उपयोग यामुळे आदिवासी मुलांना, विशेषत: माडिया गोंड मुलांना मातृभाषेद्वारे मराठीकडे वाटचाल करणे सुलभ होईल अशी अपेक्षा आहे. त्यादृष्टीने आदिवासींच्या संदर्भातील भाषिक, शैक्षणिक आणि सामाजिक प्रश्न सोडविण्याच्या वाटचालीतील एक महत्त्वाचे पाऊल म्हणजे हा आदिवासी बोलीभाषा प्रकल्प होय असे म्हणता येईल. ❋

# आदिवासी भागातील औषधी वनस्पती

रमेश म. नानल

## धायटी

**उपयोगात आणला जाणारा भाग :**

**( फुले सुकविणे – सावलीत )**

**मात्रा १ ते ३ मासे**

**उपयोग**

१) जुनी आंव पडण्याची सवय असल्यास धायटी फुलचूर्ण व जिरेचूर्ण तुपासह चाटण करून दोन्ही जेवणापूर्वी खावे.

(२) स्त्रीच्या अंगावरून महिन्याच्या वेळी जास्त स्राव होणे. त्यामुळे अशक्तपणा जाणवत असल्यास जेवणापूर्वी धायटीचूर्ण २ चमचे व तूप १ चमचा असे घ्यावे. हा उपाय ४ महिने सुरू ठेवावा.

(३) लहान मुलांचे दात सुखाने येण्यासाठी धायटी चूर्ण हिरड्यांना हळुवारपणे चोळावे. रोज सकाळी व रात्री.

(४) लघवीस गढूळ, गरम, चिकट, जाड होत असल्यास धायटीचूर्ण १ चमचा व धणे चूर्ण १ चमचा रोज जेवणापूर्वी गरम पाण्यासह घ्यावे.

(५) संडासचे वेळी पातळ, भसरट मळ येणे असे असल्यास, धायटीचूर्ण २ चमचे ताकासह किंवा गरम पाण्यासह घ्यावे. त्यात ½ चमचा सूंठ घालावी म्हणजे अधिक लाभ होतो.

(६) गर्भार स्त्रीचे अतिसारासाठी धायटीचूर्ण १ मासा, इंद्रयव ( कुड्याचे बी ) चे चूर्ण १ चमचा हे मिश्रण जेवणापूर्वी खावे.

(७) जखम भरून येण्यासाठी धायटीचे चूर्ण मधांत कालवावे व त्याचा लेप करावा.

(८) जुलाब होत असल्यास धायटीचूर्ण ३ चमचा व गरम पाणी ३।४ वेळा घ्यावे.

(९) काढा टिकविण्यासाठी धायटीची सुकी फुले काढ्याच्या ½ भाग घालावा. हवा बंद बरणीत काढा ठेवावा.

## योह ( मोहडा )

**उपयोगात आणला जाणारा भाग : फुले, आन्तर्साल, दारू.**

उपयोग :

(१) **मोहाची दारू**

१. जुलाब थांबविण्यासाठी वापरतात.

२. मानसिक थकवा, चिडचिडेपणा घालविण्यासाठी वापरतात.

३. भूक लागण्यासाठी वापरतात.

(२) मोहाची फुले २ नग + वावडिंग चूर्ण – हे मिश्रण जेवणापूर्वी दोन्ही वेळ घ्यावे. यामुळे आतड्याच्या अशक्तपणाने येणाऱ्या तक्रारी, कृमी, हे रोग कमी होतात.

(३) रक्त पडत रहाणाऱ्या मूळव्याधीत, महिन्याच्या त्रासांत मोहाची फुले जेवणासह खावी.

(४) वेडाचे झटके, आचके येणे या त्रासात मोहाच्या आतील सालीचे चूर्ण १ चमचा, वेखंड ४ गुंजा व मिरे १ गुंजा हे मिश्रण रोज रात्री झोपताना घ्यावे. हा उपाय ३।४ महिने सतत करावा.

**विशेष सूचना :**

१. मोहाची दारू नेहमी वापरू नये.

२. मोहाची दारू जुनी करूनच वापरावी.

## काटे माठ

**उपयोगात आणला जाणारा भाग : पंचांग**

**औषधी कल्पना : काढा, रस, सूप, क्षार.**

उपयोग :

(१) परमा झाल्यास पंचांगाचा काढा जेवणापूर्वी ४ तोळे द्यावा. जेवताना भाजी खावी. ( त्यात जेष्ठमध आघाडा घालावा )

(२) स्त्रीचे महिन्याचे वेळी अंगावरून जास्त रक्तस्राव होत असल्यास काटे माठाचा रस १ तोळा + हळद १ मासा व कात ४ गुंजा हे मिश्रण जेवणापूर्वी घ्यावे.

(३) इसब होऊन आग होत असल्यास पानांची चटणी बांधावी. ( गारच बांधणे )

(४) गळू लवकर पिकण्यासाठी मूळीचा गरम लेप घालावा.

(५) **क्षार :**

१. लघवी सुटण्यासाठी २ गुंजाभर गुळासह द्यावा.

२. बद फुटण्यासाठी लेप घालावा.

३. मुतखडा होऊ नये म्हणून १ ते ३ गुंजा रोज जेवणापूर्वी तुपासह खावा.

## खाज कुयली

**उपयोगात आणला जाणारा भाग : शेंगेवरचे केस, बी, मूळ.**

**औषधी कल्पना : चूर्ण, काढा, पाने.**

उपयोग :

(१) गोल जंत पडण्यासाठी शेंगेवरील केस गुळातून द्यावे. त्यानंतर जुलाब द्यावा.

(२) जखमेवर पाने बांधावी.

(३) लघवी तयार करण्यासाठी मुळाचा काढा जेवणापूर्वी २।४ तोळे द्यावा.

(४) नारूवर मुळाचा लेप द्यावा नारूचा जंत ओढून काढू नये.

(५) नायटा असल्यास मूळ पाण्यात उगाळून किंवा तुळसीचे रसात उगाळून लेप लावावा.

(६) संडासला जास्त प्रमाणात होऊन थकवा येत असेल किंवा पोटात वायू धरून गुरगुरणे असेल तर बीचे चूर्ण गव्हाच्या चपातीसह खावे.

(७) शुक्र धातुचा क्षय झाल्यास बीचे चूर्ण दुधातून घ्यावे. प्रमाण १ ते ३ मासे ( ३ वेळ रोज )

## दूर्वा

**उपयोगात आणला जाणारा भाग : पाने, मूळ, पंचांग.**

**औषधी कल्पना : पानांचा रस मुळाचा ( फांट ) चहा.**

**प्रमाण : रस १ ते ३ तोळे, फांट : ४ ते ६ तोळे**

उपयोग :

(१) नाकातून रक्त येणे या तक्रारीसाठी पानाचा रस नाकात सोडावा व त्याचीच कापसात केलेली घडी नाकावर ठेवावी. १ तोळा रस खडीसाखर घालून प्यावा. या तक्रारीच्या जुन्या सवयीसाठी हा उपाय २ महिनेपर्यंत करावा.

(२) खूप ताप येऊन लघवीचे प्रमाण कमी झाल्यास मुळांचा फांट करून थोडचा थोडचा वेळाने थोडा थोडा प्यावा. याची घडी ओटीपोटावर घालावी.

(३) पित्त वाढून उलटचा, जुलाब होणे या तक्रारी वर दुर्वांचा रस २ तोळे व तूप २ तोळे एकत्र करून त्यात खडीसाखर घालून जेवणासह १।१ चमचा घासाबरोबर खावे.

(४) लघवीस जळजळीत होणे, तिडीक मारणे या त्रासासाठी दुर्वांचा रस मुळांचा फांट असे मिश्रण जेवणामध्ये घ्यावे व जेवण पूर्ण करावे. तसेच रिकाम्या पोटी घ्यावे. प्रमाण : रस २ तोळे, फांट ६ तोळे

(५) बायकांच्या अंगावरून अत्याधिक स्राव होणे. त्यामुळे अशक्तपणा जाणवणे. हातापायाची रसरस

होणे, अंगावरून जाणारा पदार्थ गरम, पातळ, वास असलेला जाणे.

या तक्रारीसाठी दुर्वांचा रस २ तोळे दोन्ही वेळच्या जेवणापूर्वी घ्यावा. हा उपाय ४ महिनेपर्यंत करावा.

(६) मूळव्याधीचे मोडाची आग होणे, रक्त पडणे किंवा संडास झाल्यावर वाटेची आग होणे असल्यास दुर्वांचा रस कापसाच्या बोळ्यात जिरवून त्या भागात ठेवावा. याने लगेच बरे वाटते. याचबरोबर दुर्वांचा रस ½ वाटी ( व तूप १ चमचा=मिळाल्यास ) जेवणापूर्वी घ्यावे.

(७) गर्भाशयाचे स्नायू कमजोर (पिशवी कमजोर) होणे व त्यामुळे ३।४ महिन्याचेवर दिवस न राहता गर्भ (पोट) पडून जाणे हा त्रास असल्यास दुर्वांचा रस खालीलप्रमाणे वापरावा.

१. १ तोळा रस+१ मासा शतावरी चूर्ण – रोज २ वेळ जेवणापूर्वी घ्यावे.
२. दुर्वांचा रस ½ कप पोटावर – ओटीपोटावर व योनी मार्गास चोळून लावावा.
३. दुर्वाचे तूप सकाळी १ तोळा घ्यावे. हे उपाय सतत ३।४ महिने सुरू ठेवावे.

(८) अंगावर पित्ताच्या गांठी उठणे, गारवारा – पाणी किंवा थंड पदार्थ खाल्यामुळे त्यांचा त्रास वाढणे व खाज सुटणे. खाजविल्यानंतर आग होणे या तक्रारी असल्यास दुर्वांचा रस अंगास चोळून मालिश करावे. पोटात रोज सकाळी व दोन्ही जेवणापूर्वी १ तोळा रस घ्यावा. रात्री जुलाबाचे औषध घ्यावे. हा उपाय ३ ते ६ आठवडे केल्यास रोग उलटत नाही.

(९) धावरे येऊन आग होत असल्यास तांदूळ, दुर्वाचे रसात वाटून त्याचा लेप घालावा. लेप गरम करू नये याने आग होणे लगेच कमी होते.

(१०) नागीण होऊन आग होत असल्यास दुर्वा उंबराच्या पानावरील गाठी व कात एकत्र वाटून त्यांचा लेप करावा.

११) डोक्यात वात चढून होणारी बडबड, तापाचा जोर वाढून डोक्यावर उष्णता चढून होणारा त्रास कमी करण्यासाठी कपाळावर दुर्वांच्या रसाची घडी ठेवत राहावी. त्रास कमी झाल्यानंतर रस पोटातही द्यावा.

१२) पोटात उष्णता खूप वाढून तोंडाची चव नाहीशी होणे किंवा कितीही खाल्ले तरी समाधान न वाटणे या दोन्हीसाठी दुर्वांचा रस+तूप हे मिश्रण रोज ३।४ वेळ घ्यावे.

(१३) तोंडात गरमपणा, जीभ, घसा, हिरडया लाल होणे, तोंड येणे या तक्रारीसाठी १ मूठभर दुर्वा चावून खाव्या व रस तोंडात गुळणीप्रमाणे धरून ठेवावा. याने लगेच फायदा होतो.

(१४) उन्हाळ्याच्या दिवसात खूप तहान लागत असल्यास १ लिटर पाण्यात १ कप दुर्वांचा रस+४ चमचे साखर घालावी. ते पाणी थोडे थोडे प्यावे. याने तहान कमी होते.

(१५) नवीन जखमेतून रक्त वाहात असल्यास, दुर्वा वाटून चटणी करावी. जखमेवर बांधावी.

## खैर

**उपयोगात आणला जाणारा भाग : काल, अंतरसाल.**
**औषधी कल्पना : अरिष्ट, काथ, कात**
उपयोग :

(१) कुष्ठ रोगांत खदिर (खैर) अप्रतिम काम करतो. पिण्यासाठी काढा किंवा अरिष्ट प्रमाण १ ते ४ तोळे.

लेपासाठी कात वापरावा. स्नानासाठी काढा वापरावा.

(२) घशात कफ दाटून खोकला येणे, थुकी येत राहणे असल्यास काताच्या गोळ्या चघळाव्या लाळ थुंकावी.

(३) इसब, नायटा यासारख्या त्वचेच्या रोगांवर काताचा लेप घालावा व अरिष्ट प्यावे. प्रमाण १ ते ३ तोळे जेवणानंतर.

(४) कान फुटून पाणी पू-रक्त येत असल्यास काताचे चूर्ण कानांत फुंकावे.

(५) दात हलणे, हिरडयातून पू येणे यासाठी काताचे चूर्ण किंवा खैराची काडी वापरून तोंड धुवावे. त्यानंतर काढ्याने गुळण्या कराव्या.

(६) रक्त स्राव होत असल्यास काताचे चूर्ण ४ गुंजा व तूप द्यावे.

(७) जुलाब होण्याची सवय असल्यास अरिष्ट (मुरवलेला काढा) द्यावे.

(८) जुना ताप येऊन पानथरी ( प्लीहा ) वाढते. त्यावर खैरसाल व चिराईत यांचा काढा रोज जेवणाच्या अर्ध्यांवर द्यावा. प्रमाण : १ ते ३ तोळे ( साल १ तोळा +चिराईत १ तोळा+पाणी १६ तोळे उकळून ४ तोळे करावे. )

### करंज

**उपयोगात आणला जाणारा भाग : पंचांग ( मूळ, साल, पाने, फुले, फळे ) बी चे तेल**

**औषधी कल्पना : रस, चूर्ण, काढा इत्यादी व तेल**

उपयोग :

(१) करंजाची काडी दात घासण्यासाठी वापरावी. याने तोंडाचा चिकटपणा कमी होतो.

(२) उंदीर चावल्यास बी उगाळून लेप करावा किंवा तेल लावावे.

(३) खरूज झाल्यास करंजेल (तेल) व लिंबाचा-रस चोळून लावावे.

(४) जखमेत जंतू झाल्यास करंज पाने निरगुडी पाने व निंबपाने वाटून केलेली चटणी जखमेवर बांधावी.

(५) सांधेदुखी, अंगदुखी असल्यास करंजपाने वाटून चटणी करावी व गरम करून लेप घालावा. शेक द्यावा.

(६) परमा झाल्यास मुळाचा रस व नारळाचं पाणी किंवा चुन्याची निवळी घालून ३।४ वेळ प्यावा. मुळाचा रस १ ते ३ तोळे.

(७) पोटात वायू साठून ढेकर येत राहतात. त्यासाठी भाताच्या पेजेत पाने घालून शिजवावी व प्यावी.

(८) अंगावर सूज आल्यास, पाने वाटून गरम करून बांधावी.

(९) वाताचा खोकला असल्यास पानांचा व मुळाचा काढा करून जेवणानंतर प्यावा. प्रमाण : १ ते ४ तोळे

(१०) अन्न जिरत नसल्यास अन्न शिजवताना करंजाची पाने घालावी.

(११) गंडमाळा झाल्यास तांदुळाच्या धुवणात मूळ उगाळून लेप घालावा.

(१२) अंगास कंड सुटत असल्यास करंज तेल चोळावे.

(१३) ओकारी होत असल्यास करंजाची बी भाजून तुकडे करून चघळावे.

(१४) गोल जंत पडत असल्यास करंजाच्या पानांचा रस १ ते ३ तोळे द्यावा. १ तासाने जुलाबाचे औषध द्यावे.

(१५) सर्दी दाटून डोके दुखत असल्यास मूळ कुटून कापडावरून गाळून घ्यावे. ते चूर्ण तपकीरीप्रमाणे ओढावे व मुळाचे गंध उगाळून त्याचा लेप घालावा. ❋

**( ॲकेडमी ऑफ डेव्हलोपमेंट सायन्स मु. पो. कशेळे, ता. कर्जत, जि. रायगड यांचे--सौजन्याने )**

---

## स्त्री-आरोग्यप्रबोधनविषयक चल-शिबीर : पृष्ठ ८ वरून

भाषेतून बोलू शकत नव्हते, त्यांचे वाक्य ताबडतोब भाषांतरित करून सांगण्यात येई. एकूण वातावरण खेळीमेळीचे असल्याने महिलादेखील नि:संकोचपणे भाग घेत. अनेकदा उस्फूर्त प्रतिसाद देत. शंकाही विचारीत. आरोग्यविषयक माहितीबरोबरच प्रात्याक्षिकेही करून दाखविण्यात येत. तपासणी करून रोगनिदान करून औषध योजनाही करण्यात आली.

### चांगल्या पद्धतीचे कौतुक

त्या भागातील आदिवासींच्या आहार पद्धती लक्षात घेऊन, तेथेच मिळू शकणाऱ्या शेतमालातून आणि जंगल उत्पादनातून सकस आहार कसा घेता येईल ह्याची माहीती देण्यात आली. तसेच त्यांच्या काही प्रचलित पद्धतीमधील सुयोग्य अशा पद्धतींचे कौतुक करून फक्त स्वच्छतेच्या दृष्टीने काही जुजबी सूचना करण्यात आल्या. याचे उत्तम उदाहरण म्हणजे भाजी तयार करण्याची पद्धत मातीचे एक लहान माठासारखे भांडे त्या स्त्रिया शेगडीवर ठेवतात. त्यात पाणी टाकतात. त्या पाण्याला उकळी फुटली की त्यात चिरलेली भाजी टाकतात. त्यात थोडी मिरची व मीठ टाकतात. ते थोडे उकळवून खाली उतरवितात आणि मग खातात. यात भाजीतील जीवनसत्वे टिकून राहतात. तेलाचा वापर अत्यल्प असतो. लहान मुलांच्या पोषणाच्या दृष्टीने त्यांना दूध देणे कसे योग्य आहे इतर कोणता उपयुक्त आहार द्यावा इत्यादी गोष्टीही पटवून देण्यात आल्या.

मातेचे आरोग्य आणि बाळाचे संगोपन यात गर्भावस्थेपासून प्रसूतीपर्यंत तसेच प्रसूतीच्या वेळी आणि नंतरच्या काळात कोणत्या गोष्टी कराव्यात आणि कोणत्या टाळाव्यात ते समजावून देण्यात आले. तसेच लहान मुलाचे संगोपन त्यात मुलीची शारीरिक अवस्था रोगप्रतिबंधक लसीचे महत्त्व इ. गोष्टीबाबतचे महत्त्व सांगण्यात येऊन प्रात्याक्षिके देण्यात आली.

शरीराची निगा आणि सभोवतालची स्वच्छता यावर स्वतंत्र प्रबोधन करण्यात येऊन कचरा व सांडपाणी ह्यांची योग्य विल्हेवाट कशी लावावी, पिण्याचे पाणी स्वच्छ कसे ठेवावे, तसेच गावाची स्वच्छता व आपले स्वत:चे आरोग्य कसे राखावे, इत्यादींवर तेथील पर्यावरणाची स्थिती लक्षात घेऊन माहीती देण्यात आली. प्रत्येक ठिकाणी शिबिराचे शेवटी रोगनिदान औषध वाटप आणि इंजेक्शन देण्याचा कार्यक्रम करण्यात आला.

या चल-शिबिराचे मूल्यमापन करीत असता असे दिसून आले की वारंवार अशी शिबिरे आयोजित केल्यास आरोग्यविषयक जाणीव जागृतीचा स्तर निश्चित उंचावला जाईल. ❋

# मु. पो. आश्रमशाळा

## नुरसिंग राठोड

इन्सपेसनसाठी येडीया येत हाय लोल्ल्यावर
सम्दी साळा सफा झाली
आमालाबी हभ्यासाची तलप आली
वार्डन मन्ला, 'काई पुस्ऐ, चागलं म्हणा रे'
मंग डोलले पोरं सारे . . .
आला येडीया, हामी नमस्कार केला
त्यानं हजरी पुसली, मास्तरनं सांगली
त्यानं वर्ग पुसले, मास्तरनं सांगले
त्यानं जाती पुसल्या, मास्तर मन्ला, 'सांग रे'
महा नंबर आला त् मन्ला येडीया
'लमानी पोहरादेवीला बकरे का कापतात कुंडा?'
'सर, सेवालाल म्हाराज शेळकी होता !'
मंग त्या गोरमाटी येडीयानं महे कान धरले
मला उद्धट म्हणाले, सामाहीत नापास
करालां सांगले . . .
सांजेला आमी पोरंपोरं कोंबडीचे पिसं उपटतांना
माज्या मित्राला मन्ले,
'मास्तर, येडीया आल्यावर कोंबडं का
कापतात, भिया ?'
बाजूलाच मास्तर खाकरला
'जेवनाची घंटी झाली, जा रे पोरांनो, जा–'

□ □

## तानाजी सिडाम

पंदरा आगस्च्या कारेकर्मात
कोन्तरी मास्तरले कारी लावली गा,
मले उटवुन मन्ला–
'परधान ग्नबे तू तान्या
मंग वाजव बरं लग्नाचा बाजा'
माही फाटली. 'माले नाई वाजोता येअे जी–'
'मंग बेट्या, तू परधान नाही !'



मन्ला मास्तर, अन् सम्दे हसले खिखिखि
मी चिडलो, अन् थुका गिळलो
त्यानं दात खाल्ले, मी नाई मन्लो
त्यानं कारण पुसलं, मी सांगुन टाकलो
'माझा आजा आन् बाप वाजवत होता
आता आमी वाजवाचं सोडलो–'
त्यानं छडी बोलावली, सम्दे चिडीचुप
हात पुढं कराच्या आग्दोरच त्यानं सुरु केलं
सपासप
मेलो न् मेलो मन्लं, चोलण्यात मुतलो
'छडीसाठी सम्दया मेंदीचा उपट न कुपाटा–
मातर नाई वाजवणार बाजा–
काय झ्याट उपटसील तू, तूहा आजा !'
आन् मास्तरचा हातच लचकून गेला . . .

–भुजंग मेश्राम

# कायदेशीर हस्तांतरितजमिनी आदिवासींना परत मिळणार

शरद कुलकर्णी

**आ**दिवासींच्या जमिनीच्या हस्तांतरासंबंधी दोन महत्त्वाचे कायदे १९७४ साली झाले. त्यापैकी पहिला कायदा Maharashtra Land Revenue Code and Tenancy Law's ( Amendment ) Act, ( १९७४ चा क्रमांक ३५ ). ६ जुलै १९७४ पासून कार्यवाहीत आला. ह्या कायद्यान्वये आदिवासींच्या जमिनी बिगर आदिवासींकडे हस्तांतर करण्यावर बरेच निर्बंध लादण्यात आले. त्याचप्रमाणे आदिवासींच्या बेकायदेशीरपणे हस्तांतरित झालेल्या जमिनी त्यांना परत मिळवून देण्याविषयी तरतुदी करण्यात आल्या.

त्यानंतर सरकारने Maharashtra Restoration of Lands to the Scheduled Tribes Act ह्या नावाचा दुसरा कायदा केला. ( १९७५ चा क्रमांक १४). ह्या कायद्याच्या सुरुवातीपासूनच त्याच्या अंमलबजावणीत अनेक अडथळे येत गेले. ह्या कायद्याचा उद्देश विक्री, अदलाबदल, देणगी, गहाणवट ह्यासारख्या वैध मार्गांनी झालेल्या हस्तांतरित जमिनी आदिवासींना परत मिळवून देणे हा हेतू होता. ह्या कायद्यासंबंधीचे विधेयक विधानसभेत मांडताना ते अतिशय क्रांतिकारक आहे असे त्यावेळचे महसूलमंत्री श्री. एच. जी. वर्तक ह्यांनी म्हटले. हे विधेयक एकमताने संमत झाले. हे विधेयक विधानसभेत ३० ऑगस्ट रोजी तर विधानपरिषदेत ३ सप्टेंबर १९७४ रोजी संमत झाले. मात्र बिनविरोध संमत झालेल्या ह्या विधेयकाला राष्ट्रपतींची संमती मिळण्यास बराच काळ लागला आणि ह्या कायद्याची अंमलबजावणी १ नोव्हेंबर १९७५ पासून सुरू झाली. ह्या कायद्यामुळे आदिवासींच्या जमिनी कायद्यातील पळवाटा घेवून बळकावणाऱ्या बिगर आदिवासींमध्ये फार खळबळ उडाली. ह्या कायद्याच्या कायदेशीरपणाबाबत हरकत घेणारे अनेक खटले मुंबई उच्च न्यायालयात तसेच सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आले आणि कायद्याच्या अंमलबजावणीविरुद्ध स्थगिती मिळविण्यात आली. त्यामुळे ह्या कायद्याची अंमलबजावणी बरोबर होऊ शकली नाही. सरकारने क्रांतीकारी म्हणून गौरविलेला हा कायदा न्यायालयाच्या आवारातच अडकून राहतो की काय अशी भीती निर्माण झाली.

सुदैवाने ४ डिसेंबर ८४ रोजी सर्वोच्च न्यायालयाने ह्या कायद्याविषयीचा अंतिम निर्णय देवून हा कायदा पूर्णपणे वैध आहे असे घोषित केले आहे. त्यामुळे आता ह्या कायद्याची व्यवस्थित अंमलबजावणी व्हावी म्हणून आदिवासी विभागात काम करणाऱ्या सर्व कार्यकर्त्यांनी प्रयत्न करणे आवश्यक आहे. नेहमीप्रमाणेच प्रस्थापित मंडळी सर्व तऱ्हेचे योग्य व अयोग्य मार्ग अवलंबून ह्या कायद्याची व्यवस्थित अंमलबजावणी होऊ देणार नाहीत हे उघड आहे. ह्याउलट कार्यकर्त्यांनी व्यवस्थित अंमलबजावणीसाठी प्रयत्न केल्यास किमान १०,००० आदिवासी कुटुंबांना त्यांच्या जमिनी परत मिळवून देता येतील असा माझा अंदाज आहे. हे आव्हान कार्यकर्त्यांनी स्वीकारावे अशी विनंती आहे.

❋

## वर्ग ३ व वर्ग ४ मधील पदांवर सरळ सेवाप्रवेशाने उमेदवारांची भरती करताना मुलाखतीसाठी जिल्हा आदिवासी विकास अधिकारी यांना बोलावण्याबाबत—

**महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग**

परिपत्रक क्रमांक बीसीसी. १०८४/१७७/१६–ब
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २४ मे १९८४.

**पहा** – शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी. १०७३–जे, दिनांक २५ मे १९७३.

**परिपत्रक** – शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी. १०७३–जे, दिनांक २५ मे १९७३ अन्वये सर्व नियुक्ती अधिकाऱ्यांना असे आदेश देण्यात आले आहेत की, वर्ग ३ आणि वर्ग ४ मधील पदांवर सरळ सेवा प्रवेशाने भरती करताना ज्या मुलाखती घेतल्या जातात त्यावेळी मागासवर्गीय उमेदवारांचे हित अबाधित राखण्याच्या दृष्टीने आणि मागासवर्गीयांसाठी असलेल्या आरक्षण आणि इतर सवलती याबाबतच्या शासकीय आदेशांची काटेकोरपणे अंमलबजावणी होते किंवा नाही याची खात्री करण्यासाठी या मुलाखतींच्या वेळी समाजकल्याण अधिकारी (वर्ग–२ पेक्षा कमी दर्जा नसलेले) यांना बोलावणे आवश्यक आहे.

२. आता आदिवासी विकास विभाग हा नवीन विभाग स्थापन करण्यात आला असल्यामुळे जिल्हा स्तरावर आदिवासी विकास अधिकारी नेमण्यात आले आहेत, म्हणून यापुढे वर्ग ३ व वर्ग ४ मधील पदांकरिता मुलाखती घेताना समाजकल्याण अधिकाऱ्यांबरोबरच जिल्हा 'प्रकल्प अधिकारी' (वर्ग–२ पेक्षा कमी दर्जा नसलेले) यांनासुद्धा मुलाखतीसाठी बोलाविण्यात यावे अशा सूचना सर्व नियुक्ती अधिकाऱ्यांनादेण्यात येत आहेत. जिल्हा प्रकल्प अधिकारी यांनीही मुलाखतीचे आमंत्रण पत्र पाठविताना ते किमान एक महिना अगोदर पाठविण्यात यावे. जिल्हा आदिवासी विकास अधिकारी यांच्या अनुपस्थितीत घेण्यात आलेल्या मुलाखती किंवा करण्यात आलेल्या नेमणुका या नियमबाह्य (irregular) समजल्या जातील. ज्या जिल्ह्यात प्रकल्प अधिकारी नसतील त्या जिल्ह्यात हे आदेश सध्या लागू करण्याची आवश्यकता नाही.

३. वरील आदेशांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी अशी विनंती सर्व नियुक्ती अधिकाऱ्यांना करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(सही)..................
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

# ग्रामीण भागातील प्रश्नांवर अभ्यासासाठी शिष्यवृत्ती

आदिवासी भागातील खालील विषयांवर स्थानिक सामाजिक संघटनांच्या सहाय्याने अभ्यास करू इच्छिणाऱ्यासाठी शिष्यवृत्ती.

१) **वनौषधी आरोग्य विज्ञान** : पारंपारिक वनौषधीवर आधारीत आरोग्य पद्धती समजावून घेऊन सामाजिक आरोग्य योजना बनविणे.

२) **पाणी** : अवघड भागात लघुपाटबंधारे, पाझर तलाव, लहान धरणे इ. च्या साह्याने पाणीपुरवठा कसा करता येईल ह्यासंबंधी राबविण्यालायक योजना बनविणे.

३) **वनीकरण** : सरपण, पशुखाद्य, इमारती लाकूड, औषध व इतर दृष्टीने निवडलेल्या गावांकरीता सामा. वनीकरण योजना तयार करणे.

४) **तंत्रज्ञान** : स्थानिक साधनांच्या उपलब्धते व गरजेनुसार योग्य तांत्रिक प्रक्रियांचा अभ्यास करून एखादा उद्योग सुरू करता येईल काय ह्या संबंधीचा अभ्यास.

५) **जमिनींचे प्रश्न** : जमिनीसंबंधात जमीन हस्तांतर नावावर नसणे, नावावर असून कब्जात नसणे, आदिवासींच्या जमिनीची विक्री इ. संबंधी अभ्यास.

६) **लोककला** : स्थानिक लोककला इतिहास व सद्य परिस्थिती समजावून घेऊन लोककला विकासाची दिशा सुचविणे.

संपर्क– चिटणीस, ॲकेडमी ऑफ डेव्हलपमेंट सायन्स, मु. पो. कशेळे, ता. कर्जत ४१० २०१, जि. रायगड

# आश्रमशाळांच्या सुधारणेसाठी शिफारशी

डॉ. पुरुषोत्तम सिरसाळकर

१९८१ च्या शिरगणतीप्रमाणे महाराष्ट्र राज्यात आदिवासींची लोकसंख्या ५७.७२ लाख आहे. महाराष्ट्र राज्याच्या एकूण लोकसंख्येशी हे प्रमाण ९ टक्के आहे. महाराष्ट्र राज्यात एकूण शासकीय ३२५ आश्रमशाळा व ९९ स्वयंस्फूर्त संस्थांनी चालविलेल्या आश्रमशाळा आहेत. या दोन्ही प्रकारच्या आश्रमशाळांत अंदाजे एक लाख २५ हजार आदिवासी मुले व मुली शिक्षण घेत आहेत. आदिवासींनी सर्व स्तरांवरील शिक्षण मोफत आहे. आदिवासी शैक्षणिक दृष्टचा मागासलेले आहेत, हे खालील तक्त्यावरून आढळून येईल :—

तक्ता क्रमांक १

| | सर्वसाधारण लोकांची टक्केवारी | | | आदिवासींची टक्केवारी | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | पुरुष | स्त्रिया | एकूण | पुरुष | स्त्रिया | एकूण |
| १९७१... | ३९ | ५१ | २६ | १९ | ४ | ११ |
| १९८१... | ४७ | ५३ | ३५ | ३२ | ११ | २२ |

महाराष्ट्र राज्यात १९७२ पासून शासकीय आश्रमशाळांची योजना कार्यान्वित आहे. या आश्रमशाळांच्या कारभारात सुधारणा करण्याच्या दृष्टीने व शासनास मार्गदर्शन करून ठास उपाय सुचविण्याच्या उद्देशाने शासनाने समिती स्थापन केली.

सदर समितीने शासकीय आश्रमशाळांना भेटी देऊन संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करून व सखोल अभ्यास करून आपला अहवाल तयार केला. या अहवालातील शिफारशी शासनाच्या विचाराधीन आहेत. या अहवालातील महत्त्वाच्या शिफारशी खालीलप्रमाणे आहेत—

**( १ ) आश्रमशाळांच्या इमारतींचे बांधकाम**

अनुसूचित व डोंगराळ विभागात राहणाऱ्या आदिवासींचा शैक्षणिक व सामाजिक विकास जलदगतीने घडवून आणण्यासाठी आश्रमशाळा समूहाची योजना १९७२–७३ वर्षापासून सुरू करण्यात आलेली आहे. समितीच्या मते आश्रमशाळा ही एक अत्यंत उपयुक्त अशी योजना आहे व या द्वारे आदिवासींची शैक्षणिक उन्नती होण्यास निश्चितच मदत मिळणार आहे; परंतु ज्या पद्धतीने आज शासकीय आश्रमशाळांचा कारभार चालू आहे, त्या पद्धतीने त्यांचा जलद शैक्षणिक विकास होईल असे समितीस वाटत नाही. समितीच्या निदर्शनास आणून देण्यात आले की ३२३ शासकीय आश्रमशाळांपैकी फक्त ५२ आश्रमशाळांची बांधकामे पूर्ण झालेली आहेत व ४७ आश्रमशाळांची बांधकामे चालू असून प्रगतिपथावर आहेत व हे काम होण्यासाठी ५ कोटी ८८ लाख ९६ हजार रुपयांची गरज आहे. या वरून असे दिसून येईल की, आजपर्यंत अकरा वर्षात फक्त १६ टक्के इमारतीचे बांधकाम पूर्ण करण्यात आलेले आहे व १४ टक्के इमारतीचे बांधकाम प्रगतीपथावर आहे. निधीच्या उपलब्धतेनुसार ४७ आश्रमशाळांची बांधकामे पूर्ण होण्यासच आणखी पाच वर्षांच्या कालावधीची कमीत कमी गरज आहे. याशिवाय राहिलेल्या २२४ ठिकाणी इमारती बांधण्याचा एक धडक कार्यक्रम शासनाने हाती घेणे आवश्यक आहे. आज २२४ ठिकाणी आश्रमशाळा, खाजगी मालकीच्या झोपड्यांत, घरात ट्युब्युलर स्ट्रक्चरमध्ये आहेत. आदिवासी खेड्यात भाड्याने चांगली जागा मिळणे अशक्य आहे त्यामुळे मिळतील त्या जागा घ्याव्या लागतील. मुलांच्या व मुलींच्या संख्येच्या मानानेही राहण्याची, जेवण्याची व झोपण्याची व्यवस्था अत्यंत असमाधानकारक आहे अशा परिस्थितीत वर्षानुवर्षे चाललेल्या आश्रमशाळा या खऱ्या अर्थाने शाळांचे कामकाज प्रभावी रीत्या करू शकत नाहीत असे समितीचे मत आहे. त्यामुळे आदिवासी मुले व मुली चांगल्या शैक्षणिक वातावरणास मुकली आहेत व निकृष्ट वातावरणात त्यांची जडणघडण चालू आहे. ह्या परिस्थितीत लवकरात लवकर बदल घडवून आणण्यासाठी इमारतीच्या बांधकामाबाबत समितीच्या खालील ठोस सूचना आहेत—

(अ) यापूर्वीच्या बांधकामाचा आराखड्याप्रमाणे

मान्य खर्च, एका आश्रमशाळेसाठी २५.४८ लाख आहे. बांधकामाचे साहित्य व मजुरी यांची वाढ लक्षात घेता वरील खर्च प्रत्येक आश्रमशाळेसाठी रु. ४२.७० लाखापर्यंत वाढणार असल्याचे सांगण्यात आले. या पद्धतीने आज अस्तित्वात असलेल्या शासकीय आश्रमशाळा बांधण्यात आल्या तर त्यास ९६ कोटी १२ लाख रुपये खर्च येईल व यासाठी खूपच कालावधी लागण्याची शक्यता आहे. या सर्व परिस्थितीचा विचार करून **समितीची अशी ठाम सूचना आहे की, हचा मान्य महागडचा बांधकामाच्या आराखडचात त्वरित बदल करावा व खालीलप्रमाणे दोन टप्प्यांत शासकीय आश्रमशाळांचे बांधकाम टिकावू, परंतु कमी खर्चात १९८३–८४ वर्षापासूनच करावे**

एका आश्रमशाळेसाठी १६ लाख रुपये खर्च खालीलप्रमाणे करावेत :

सर्व आश्रमशाळांचे पहिल्या टप्प्यांचे खालीलप्रमाणे काम अग्रक्रमाने घ्यावे–

| पहिला टप्पा | लाख रु. |
|---|---|
| (अ) शाळेतील सात खोल्या, हॉल, स्वयंपाकगृह, कोठीचे घर. | ४.६९ |
| (ब) दोन क्वार्टर्स, बालवाडी, शिक्षिका व अधीक्षक यांचेसाठी. | १.३१ |
| (क) बोअरवेल | ०.५२ |
| (ड) वीज | ०.४८ |
| पहिल्या टप्प्याचा एकूण खर्च | ७.०० |
| **दुसरा टप्पा** | |
| (इ) शाळेतील स्वच्छतागृहे | ०.९४ |
| (ई) मुलींसाठी स्नानगृहे व स्वच्छतागृहे | ०.८७ |
| (फ) मुलींचे वसतिगृह | २.२० |
| (त) दहा क्वार्टर्स शिक्षिकांसाठी | ३.०२ |
| (म) वर्क चार्जेस | ०.३६ |
| (द) इतर | ०.६५ |
| (घ) वीज | ०.३६ |
| (न) जागेचा विकास | ०.१० |
| (प) जोड-रस्ते | ०.५० |
| दुसऱ्या टप्प्याचा एकूण खर्च | ९.०० |
| एकूण ( ७.०० + ९.०० = १६ लाख ) | |

याप्रमाणे एका आश्रमशाळेचा खर्च अंदाजे १६ लाख असेल, त्यापैकी ७ लाख पहिल्या टप्प्यात खर्च अपेक्षित आहे. **समितीची ठोस सूचना आहे की, शासकीय आश्रमशाळांची आजची परिस्थिती बदलण्यासाठी व या माध्यमातून आदिवासींचा शैक्षणिक विकास घडवून आणण्यासाठी शासनाने इमारतींच्या बांधकामाच्या पहिल्या टप्प्याचा कालबद्ध कार्यक्रम प्राधान्य देऊन हाती घ्यावा व पुढील चार वर्षांत सर्व ठिकाणी इमारतींचे बांधकाम करून आश्रमशाळांची प्राथमिक गरज भागवावी व यासाठी दरवर्षी पाच कोटी रुपयांची कमीत कमी तरतूद १९८४–८५ वर्षापासून करावी.** तसेच केंद्र शासनाकडून मिळणारा अथवा उपयोजनेच्या फंडातूनही मिळणारा काही पैसा इमारतींसाठी वापरावा.

(ब) आश्रमशाळांच्या इमारतींच्या बांधकामासाठी अपुरा निधी असताना देखील समितीच्या असे निदर्शनास आले आहे की, सार्वजनिक बांधकाम विभाग १६ टक्के एजन्सी चार्जेस व इतर चार्जेस शासकीय आश्रमशाळांच्या बांधकामावर लावतात तेव्हा अशी शिफारस आहे की, त्यांनी शासकीय आश्रमशाळांच्या बांधकामावर खात्याचे एजन्सी व इतर चार्जेस लावू नयेत व हे बांधकाम कालबद्ध कार्यक्रमानुसार लवकरात लवकर पूर्ण करण्याचा प्रयत्न करावा.

(क) आश्रमशाळांसाठी मुताऱ्या व स्वच्छतागृहे गांधी स्मारक निधी, पुणे यांनी तयार केलेल्या नमुन्याप्रमाणे कमी खर्चात व टिकतील अशा रीतीने स्थानिक परिस्थितीप्रमाणे बांधावीत.

(ड) उपयोजना क्षेत्राबाहेर ६८ आश्रमशाळा कार्यान्वित आहेत. त्यांच्या इमारतींसाठी डीपीडीसीमध्ये पुरेसा पैसा उपलब्ध नसल्यामुळे त्यांच्यासाठी देखील कालबद्ध कार्यक्रम शासनामार्फत राज्य पातळीवर राबवावा ही शासकीय आश्रमशाळा योजना संपूर्ण रीत्या राबविण्याची जबाबदारी शासनाने घ्यावी व त्याचे नियोजन जिल्हा पातळीवरील काढून राज्य पातळीवर ठेवावे.

## (२) आश्रमशाळांसाठी जमीन

समितीच्या निदर्शनास आले आहे की, आजतागायत ३२३ पैकी फक्त १८१ ठिकाणी ( ५५ टक्के ) जमीन उपलब्ध झाली आहे व १४२ ठिकाणी ( ४५ टक्के )

अद्याप जागा उपलब्ध झालेली नाही. लवकरात लवकर जागा मिळविण्यासाठी समितीची शिफारस आहे की, जिल्हानिहाय या कामासाठी कलेक्टरांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमावी.

## (३) पाणी

समितीच्या निदर्शनास असेही आले आहे की, काही आश्रमशाळांच्या ठिकाणी पाण्याची अडचण आहे. त्यामुळे मुलांना व मुलींना आठवड्यातून एकदाच आंघोळ करावी लागते. पिण्यासाठी देखील पाणी बऱ्याच ठिकाणी बैलगाडीतून आणले जाते. मुलांना व मुलींना नदीनाल्यावर आंघोळीस जावे लागते. त्यांचे अंथरूण व पांघरूण तसेच कपडे अस्वच्छ असतात. त्यामुळे त्यांना त्वचारोग होतात.

(अ) ही परिस्थिती सुधारण्यासाठी समितीची अशी शिफारस आहे की, ज्या ठिकाणी जमीन उपलब्ध होईल व बांधकाम होणार आहे, त्या ठिकाणी यापुढे प्रथम बोअरवेल, संबंधित शास्त्रज्ञांच्या सल्ल्याने (जीएसडी) घ्यावी व पाणी लागले तरच त्या इमारती बांधाव्यात. अन्यथा दुसऱ्या ठिकाणी जागा मिळवावी की ज्या ठिकाणी पाणी लागू शकेल. पाण्याची व्यवस्था झाल्यावरच इमारती बांधाव्यात.

(ब) सर्वेक्षण करताना जीएसडीच्या अधिकाऱ्यांचा शास्त्रीय सल्ला घ्यावा व पाणी मिळत असेल तरच जागा निवडावी.

(क) इमारती झालेल्या आश्रमशाळांतील पाण्याची टचाई दूर करण्यासाठी संचालक, आदिवासी विकास, नाशिक यांनी संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करून हा प्रश्न जलदगतीने कसा सोडविता येईल याचा विचार करून सातत्याने त्याचा पाठपुरावा करणे आवश्यक आहे असे समितीस वाटते. तसेच जवळपास पाणी असल्यास ते उपलब्ध होऊ शकेल किंवा नाही याचाही विचार करणे आवश्यक आहे. बऱ्याच ठिकाणी खूप खर्च करून इमारती बांधण्यात आल्याचे आढळून आले पण त्यापैकी कोठेही आवश्यक पाण्याची सोय आढळून आलेली नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांना खूपच त्रास सहन करावा लागत असल्याचे समितीस आढळून आले.

## (४) वसतिगृहे

ज्या तालुका / जिल्हा अथवा जवळील मोठ्या गावी चांगले हायस्कूल असेल त्या ठिकाणी मुलांची व मुलींची स्वतंत्र वसतिगृहे उघडावीत व या सातवी पास होणाऱ्या आश्रमशाळेतील मुलांची व मुलींची आठवीपासून शिक्षणाची सोय त्या शाळांतून करावी. उपयोजना क्षेत्रातील प्रत्येक तालुक्याच्या व जिल्ह्याच्या ठिकाणी आवश्यकतेनुसार, मुलांची व मुलींची वसतिगृहे, समाजकल्याण संचालनालयाच्या धर्तीवर आदिवासी मुलामुलींसाठीच काढावीत. आदिवासी विकास संचालनालयांनी याबाबतचा कार्यक्रम आखावा व पुढील पाच वर्षात याची पूर्तता करून घ्यावी. या व्यवस्थेमुळे चांगल्या शाळांतून आदिवासी पाल्यांना शिक्षण मिळेल. नगर नियोजनामधील शासकीय जागा, तालुका व जिल्ह्याच्या ठिकाणी, वसतिगृहासाठी राखून ठेवण्याच्या सूचना शासनाने संबंधितांना द्याव्यात अशी समितीची शिफारस आहे.

## (५) इन्सेन्टीव्हज

उत्तम शिक्षकांना व अधीक्षकांना आदिवासी भागातील आश्रमशाळांत आकर्षित करण्यासाठी त्यांना खालील इन्सेन्टीव्हज द्यावीत—

(अ) पगाराच्या श्रेणीतील दोन वार्षिक वाढी जादा देऊन नेमणूक.

(ब) राहण्यासाठी मोफत निवासाची सोय अथवा त्यांना द्यावयास लागणारे घरभाडे रु. ५० पर्यंत शासनाने त्यांना त्यांची निवासाची मोफत सोय होईपर्यंत द्यावे.

(क) त्यांच्या मुलांसाठी पुढील शिक्षणासाठी शासकीय वसतिगृहात मोफत राहण्याची व जेवणाची सोय.


## (६) आश्रमशाळा ( शिक्षण ) शिक्षक

आदिवासी विभागातील शिक्षण सुधारण्याची जबाबदारी प्रामुख्याने शिक्षण संचालनालयाची आहे असे समितीला वाटते.

### (अ) शिक्षक (प्राथमिक)

समितीच्या असे निदर्शनास आले आहे की, शासकीय प्राथमिक आश्रमशाळांत अप्रशिक्षित शिक्षकांची संख्या ४८३ आहे.

**१. या शिक्षकांना प्रशिक्षित करण्यासाठी पाच वर्षांचा कालबद्ध कार्यक्रम संचालक, शिक्षण संचालनालयांनी संचालक, आदिवासी विकास नाशिक यांच्याशी**



**चर्चाकरून आखावा** व त्यांना प्रशिक्षित करून घ्यावे. त्यांच्यापैकी जे प्रशिक्षित होणार नाहीत त्यांना प्राथमिक शिक्षकाचे काम देऊ नये.

२. **यापुढे अर्धशिक्षित शिक्षकांची नेमणूक करू नये.** आदिवासी भागात इतर गोष्टींना प्राधान्य न देता प्रशिक्षित शिक्षक घ्यावेत. यामुळे शिक्षणाचा दर्जा प्राथमिक स्तरावर सुधारेल अशी समितीची धारणा आहे.

३. जिल्हा परिषदेतील अनुभवी शिक्षक व खाजगी माध्यमिक शाळेतील अनुभवी शिक्षक जर आश्रमशाळेत नोकरी करण्यास उत्सुक असतील तर त्यांची पूर्वीची सेवा ग्राह्य धरून व त्यांना सुरुवातीस शंभर रुपये विशेष पगार देऊन त्यांना शासकीय सेवेत कायमचे घ्यावे. यामुळे त्यांच्या अनुभवाचा फायदा आश्रमशाळातील सध्याचे व्यवस्थापन सुधारण्यास होईल असे समितीला वाटते.

**(ब) शिक्षक ( माध्यमिक )**

समितीस असे आढळून आले आहे की, माध्यमिक स्तरावर देखील ७८ शिक्षक अप्रशिक्षित आहेत. **त्यांनाही प्रशिक्षित करण्याचा कालबद्ध कार्यक्रम संचालक, शिक्षक संचालनालय, पुणे यांनी आखावा** व ते प्रशिक्षित होतील याची खात्री करून घ्यावी. प्रशिक्षणाची जबाबदारी शिक्षण संचालनालयाची असावी व आवश्यक पैसा व अप्रशिक्षित शिक्षक संचालक, आदिवासी विकास, नाशिक यांनी पुरवावा असे समितीस वाटते.

**(७) स्वयंस्फूर्त संस्थांनी चालविलेल्या आश्रमशाळा**

स्वयंस्फूर्त संस्थांनी चालविलेल्या आश्रमशाळांचाही अभ्यास करून या योजनेचा सर्व बाजूने विचार होणे आवश्यक आहे असे समितीस वाटते. या आश्रमशाळांच्या कारभारात सुधारणा करण्याच्या दृष्टीने

व ठोस उपाय सुचविण्याच्या दृष्टीने शासनाने समिती नेमावी अशी या समितीची शिफारस आहे.

**(८) शालेय तपासणी, पर्यवेक्षण व शैक्षणिक प्रशासनासाठी यंत्रणा.**

(अ) आश्रमशाळांवर अधिक लक्ष केंद्रित करण्याच्या दृष्टीने तपासणी अधिकाऱ्यांनी वर्षभरात दोन भेटींऐवजी वारंवार भेटी देणे आवश्यक आहे. आश्रमशाळांची दरवर्षी वार्षिक तपासणी करणे आवश्यक आहे. आश्रमशाळांवर देखरेख ठेवणे, तपासणी करणे इत्यादी बाबींसाठी संचालक, आदिवासी विकास, नाशिक यांच्या कार्यालयात स्वतंत्र यंत्रणा निर्माण करण्याची समितीची शिफारस आहे. यामुळे शिक्षकांना शैक्षणिक मार्गदर्शन मिळेल, शाळेतील उणीवा दूर करण्याचे प्रयत्न होतील व शाळांचा शैक्षणिक दर्जा सुधारेल असे समितीस वाटते.

आदिवासी विकास संचालनालयात खालील पदे त्वरित निर्माण करावीत अशी समितीची शिफारस आहे.

(१) सह संचालक ( १ पद )
(२) उप संचालक ( शिक्षण ) ( १ पद )
(३) उप संचालक ( ४ पदे )
(४) इतर आवश्यक कर्मचारी.

तसेच उपयोजना फंडातून सध्या गटविकास अधिकारी यांच्या कार्यालयात असलेला विस्तार अधिकारी देखील आदिवासी विकास संचालनालयाच्या मार्गदर्शनाखाली आश्रमशाळांचेच काम करण्यासाठी असावेत, असे समितीस वाटते.

(ब) आश्रमशाळांत ऑडिट अनेक वर्षांपासून झालेले नाही, तरी ऑडिट होण्याची अत्यंत गरज आहे. असे समितीचे मत आहे. शासनाने सर्व आश्रमशाळांचे त्वरित ऑडिट करून घ्यावे अशी समितीची शिफारस आहे.

**(क) व्यवस्थापन**

(अ) आश्रमशाळांचे व्यवस्थापन सुधारण्याची अत्यंत गरज आहे. संचालक, प्रादेशिक उपसंचालक व आदिवासी विकास अधिकारी यांच्या कार्यालयातील उपलब्ध स्टाफ, कामाचा बोजा लक्षात घेता अपुरा आहे असे समितीचे मत आहे. दहा आश्रमशाळेसाठी एक आदिवासी विकास अधिकारी व पाच आश्रमशाळांसाठी एक आदिवासी विकास निरीक्षक असणे आवश्यक आहे. तसेच प्रादेशिक उपसंचालकांच्या कार्यालयात देखील पुरेसा आवश्यक कर्मचारीवर्ग नेमणे आवश्यक आहे. आदिवासी विकास अधिकाऱ्यांच्या कार्यालयात कामाच्याप्रमाणे अधिक स्टाफ असणे आवश्यक आहे. प्रादेशिक उपसंचालकांना विभागीय समाजकल्याण अधिकाऱ्यांप्रमाणे अधिकार देण्यात यावेत अशी समितीची शिफारस आहे. चार अधिक प्रादेशिक कार्यालये उघडण्यात यावीत व त्या कार्यालयांत इतर आवश्यक कर्मचाऱ्यांबरोबर शिक्षण अधिकारी, वर्ग (२)चे एक पद व आवश्यक विस्तार अधिकारी (शिक्षण) असावेत असे समितीस वाटते.

(ब) प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास क्षेत्र, यांना शासनाने उपसंचालक म्हणून घोषित केले आहे. त्यांच्यावर आश्रमशाळांना भेटी देण्याची जबाबदारी टाकण्यात आली आहे. त्यांनी केलेल्या सूचनांची पूर्तता करणे आदिवासी विकास अधिकाऱ्यांचे कर्तव्य आहे. प्रकल्प अधिकारी व आदिवासी विकास अधिकारी यांच्यात अधिक समन्वय व सलोखा निर्माण करण्याची अत्यंत गरज आहे असे समितीचे मत आहे.

**(९) विद्यार्थिनींबाबतच्या शिफारशी**

शासकीय आश्रमशाळेत मुलींची देखभाल करण्यासाठी खालील पदे त्वरित निर्माण करावीत—

(अ) स्त्रीअधीक्षक (१) समाजकल्याण विभागाच्या धर्तीवर.

(ब) मेट्रन—चाळीस मुलींमध्ये एक याप्रमाणे.

(क) स्त्री शिपाई (१)

(ड) स्त्री पहारेकरी (१)

या अहवालात एकूण ५१ शिफारशी करण्यात आलेल्या आहेत. वरील शिफारशी शिवायच्या शिफारशींत बालवाडी, शिक्षक, व्यवस्थापक, तपासणी इत्यादी बाबींबाबतच्या शिफारशी आहेत.

या सर्व शिफारशींवर शासनाच्या आदिवासी विकास विभाग व संचालक, आदिवासी विकास विभाग यांनी कार्यवाही करावयाची आहे. जलदगतीने कार्यवाही झाली तरच शासकीय आश्रमशाळांत सुधारणा काही वर्षांत दृष्टोत्पत्तीस येईल. शासकीय आश्रमशाळांच्या माध्यमातून आदिवासींच्या शैक्षणिक प्रगतीचा वेग वाढेल व यामुळेच या अशिक्षित व अडाणी समाजात बदलाच्या प्रक्रियेला देखील हातभार लागेल. आज आश्रमशाळांत आढळून येत असलेल्या उणिवा त्वरित दूर करणे, ही काळाची गरज आहे व यावरच या योजनेचे यश अवलंबून आहे. ❋

# भटक्या जमातींच्या व्यथांची कहाणी

**उपरानंतर लक्ष्मण मानेंचं ' बंद दरवाजा ' हे भटक्या जमातीचं दर्शन घडविणारं दुसरं पुस्तक. उपरामध्ये त्यांचं स्वतःचं जगणं आहे तर बंद दरवाजामध्ये स्वतंत्र भारतातील अनेक भटक्या जमातींच्या बंदिस्त–भीषण जीवनाचा त्यांनी घेतलेला शोध आहे.**

उपराच्या यशानंतर फोर्ड फौंडेशनकडून मिळालेल्या शिष्यवृत्तीचा मानेंनी भटक्यांच्या जीवनाचा शोध घेण्यासाठी उपयोग केला. अनेक वाडशा, वस्त्या, तांडे, बिऱ्हांडांमधून ते ह्या काळात फिरले. त्यांनी जे पाहिलं–अनुभवलं ते खरोखरच भयावह आहे. आपण आपल्याला किती सुरक्षित बंदिस्त करून ठेवलंय हे बंद दरवाजा वाचताना पदोपदी जाणवतं.

गिरजाअक्काची कहाणी माने जेव्हा सांगतात तेव्हा त्याला कोणत्या प्रकारचं जीणं म्हणावं हाच प्रश्न उभा राहतो. आपलं बाळंतपण सुखरूप व्हावं म्हणून 'सायेब, तुमच्या पाया पडती. माझ्या गरिबावर दया करा. सायब कायबी करा पण आणकी दोन महिन्याची शिक्षा लावा ' असं न्यायाधिशाला केवीलवाणी विनंती करणारी गिरजाअक्का आजही आपल्या जवळपास कुठंतरी राहतेय, जी आम्हाला माहीतच नाही हे काही आपल्या समाजाच्या सुखरूपपणाचं लक्षण नव्हे !

गोपाळातल्या पालीतला मानेंचा अनुभव तर काय सांगावा ? चार घरं फिरून मागून खाणारे हे लोक; पण आजची भाकर आजच खायची, उद्या खायची नाही ही ह्यांची रीत आणि मागितलेलंच खाल्लेलं बरं नाही तर माज येईल अशी त्यांच्या वाड–वडिलांची शिकवण आहे आणि हे असं का तर म्हणे आम्हाला देवाचा असाच शाप आहे. गोपाळांचा हा असा देव तरी कोणता आहे ? आम्ही श्रीकृष्णाच्या वंशाचे आहोत असं त्यांच्यापैकी एकजण मानेंना सांगतो. श्रीकृष्णाला दही–दुधाने न्हाऊ घालणाऱ्या आम्हा कितीजणांना ही जिती–जागती माणसं ठाऊक आहेत ?

अशा एक ना अनेक लोकांचा बंद दरवाजा म्हणजे जीवनपटच आहे. माने मनोगतात म्हणतात त्याप्रमाणे शासनाकडे अशा ४२ जमातींची नोंद आहे तर ह्या भटकंतीत इतरांना किंबहुना त्यांना स्वतःलाही माहीत नसलेल्या ११ जमातींचा शोध त्यांना लागला. त्याकरिता ते हवं तसं भटकले. कुठे एस्. टी. तून जाताना बिऱ्हाडं दिसली की, तेथेच उतरून पडायचं. कुठे परिषदेच्या निमित्तानं, तर कुठे बाजारात, कुठे मुंबईच्या फुटपाथवर, एखाद्या पुलाखाली मिळेल तेथे जाऊन ते माहिती घेतात; पण त्यामुळेच ते ह्या लोकांचं जीवन अस्सलपणे आपल्यासमोर उघडं करू शकतात. त्या-त्या वस्तीत गेल्यावर काही ठिकाणी त्यांना सुरुवातीला अडचणी येतात; पण एकदा त्यांचा विश्वास संपादन केला की, माणसं बोलायला लागतात असा मानेंचा अनुभव आहे.

## समाजाचं चित्र

बंद दरवाजात कागद, कापड, बुट, काचा गोळा करणाऱ्यांचं जीवन आहे तर जन्म तारखेचा दाखलाच मिळू शकत नाही म्हणून त्यांच्या शाळेत न जाऊ शकणाऱ्या मुलांचं अंधार भवितव्य आहे. गोपाळ धनगरासंबंधी माहिती आहे– त्यांच्यातील बालविवाहाच्या दुष्ट रूढींचा अनुभव आहे– बालविवाहाविरुद्ध चाललेल्या प्रयत्नांचा आढावा आहे– तेथे चालू असलेल्या विधायक कामाची नोंद आहे. पारध्याच्या पालीचं वर्णन



आहे. वैदू–गोंधळ्यासंबंधी तर बंजारा जमातीसंबंधीची विस्तृत माहिती आहे. कंजारभट ह्या गावोगावी फिरणाऱ्या समाजाचं चित्र आहे.

भटक्या–जमातीत जात–पंचायतीचा अजूनही जबरदस्त पगडा असल्याचं दिसून येतं. जात–पंचायतीच्या जाचक रूढी–रितींखाली अजूनही माणसं भरडली जात आहेत. त्यात ह्या रीती–रिवाजाखाली स्त्रियांना होणारा जाच तर डोकं सुन्न करून टाकणारा आहे. बंद दरवाजात स्त्री–जीवनाच्या अनेक भीषण अनुभवांची नोंद आहे. एका स्त्रीला ती बदफैली आहे म्हणून पंचायतीतले पंच मातीचा ढीग करून त्यावर मुततात व तिला ती माती कालवायला सांगून त्याचे पाच भाग करून पंचासमोर ठेवायला सांगतात व ग्लासातल्या मुतानं पंचासमक्ष हात धुवायला लावतात. कोणीही हादरून जाईल इतका हा भयानक अनुभव.

आणि एका नवऱ्यानं दुसऱ्याला–दुसऱ्यानं तिसऱ्याला॥ तिसऱ्यानं चवथ्याला विकलेली काडतुशीची कहाणी स्त्री–मुक्तीच्या लढ्याची दिशाच बदलून टाकणारी. माने हे पशूंचं जीवन की, माणसांचं ? असं विचारतात ते खरंच आहे. ह्या सर्व विलक्षण हकिगती वाचताना माणसाचं माणूसपण कुठे शिल्लक आहे असं खरोखरच वाटत नाही.

## सारेच विलक्षण

आणि पोलीसांकडून होणाऱ्या छळवादाच्या कथा तर अमानुषपणाच्या हद्दीही पार ओलांडून गेलेल्या. ह्यांच्यापैकी कुणाकडे ट्रान्झिस्टर असला तर तो चोरीचाच असणार म्हणून पोलीस त्याला बेदम मारणार तर कुठे अंडी चोरल्याच्या संशयावरून असंच ठोकून काढणार. कुठे पीठ चोरल्याच्या संशयावरून स्त्रियांचं उरलं–सुरलं जीणं उध्वस्त करायला ह्या यंत्रणेतील माणसाचं मन मागे–पुढे पहात नाही.


हे असं किती काळ चालू राहणार ? माने म्हणतात त्याप्रमाणे ह्याकरिता जनतेचा विवेक जागं करणं, मोठ्या प्रमाणात चळवळी करणं, अन्याय अत्याचाराविरुद्ध जनमत संघटीत करणं हाच त्यावर उपाय आहे.

माने स्वत: कार्यकर्ते असल्यामुळे ते भटक्या जमातींच्या परिषदा, मोर्चे संघटीत करण्याचे काम इतर कार्यकर्त्यांच्या सहकार्याने करीत आहेत. सोलापूर सेंटलमेंटचा – त्यातील जमिनीचा, तेथील शिक्षणाचा तर मुंढवा सेंटलमेंटच्या जमिनीचा प्रश्न घेऊन ते आज लोकांसह लढत आहेत. लातूरचा मोर्चा, औरंगाबादची संशयित गुन्हेगार निर्मूलन परिषद हे सर्व त्या लढ्याचाच भाग आहे. न्याय मागण्याचे काम त्यांनी चालू केले आहे. समाज हळूहळू का होईना जागा होतोय. आपण लढलं पाहिजे ही जाणीव त्यांच्यात वाढायला लागलेय आणि तो आपले प्रश्न घेऊन आता रस्त्यावरही यायला लागलाय आणि म्हणूनच माने आशावादी आहेत. लातूरच्या मोर्च्याचं म्हणणं ऐकून न घेणारा जिल्हाधिकारी किती काळ फिडेल वाजवत बसेल ? त्याला जाग ही आणावीच लागेल ! असं माने म्हणतात ते ह्याच आशावादातून !

मानेंचा 'बंद दरवाजा' म्हणजे भटक्या जमातीच्या व्यथांची एक कहाणीच आहे. माने त्या व्यथांचे पदर आपल्यासमोर उघडे करत जातात. ते प्रत्येक घटनाच आपल्यासमोर ठेवत असल्याने ह्या व्यथा कथन करत असताना कुठे ते अतिशयोक्ती करताहेत असं होत नाही.

ह्या बंद दरवाजावर धडक मारताना त्यांना खंत आहे आजच्या पिढीच्या नेभळटपणाची. ह्या माणसांच्या व्यथा आपल्याच व्यथा आहेत असं तुम्हा–आम्हाला केव्हा तरी वाटणार आहे की नाही ? हा खरा प्रश्न आहे.

**–रमाकांत रामचंद्र**



# आदिवासी विकास परिषद

**आदिवासी जाणीव जागृती केंद्र रायगड जिल्ह्यातील कर्जत, खालापूर, पेण तालुक्यात आदिवासी —कातकरी समाजात जागृतीचे काम करीत आहे. ह्या प्रयत्नाचाच एक भाग म्हणून केंद्रातर्फे भिलवले, ता. खालापूर येथे २ डिसेंबर रोजी खालापूर तालुका आदिवासी विकास परिषद घेण्यात आली.**

परिषदेस प्रमुख पाहुणे म्हणून ठाणे जिल्ह्यातील भूमिसेनेचे नेते श्री. काळूराम धोदडे उपस्थित होते. शे. का. प. चे चिटणीस श्री. राऊत, श्री. लक्ष्मण पेमारे, तारा—पनवेल भागात आदिवासींमध्ये काम करणारे श्रमिक क्रांतीकारी आंदोलनाचे कार्यकर्ते ॲड. राजीव पाटील, सुरेखा दळवी, रूरल कम्युन्सचे श्री. बालाजी तोरवाड, एडीएस चे श्री. मठपती, वसई भागात काम करणाऱ्या श्रमजिवी संघटनेचे श्री. विवेक पंडित, श्री. भुस्कटे, वावर्ले ग्रा. पं. चे सरपंच सभासद तसेच आदिवासी—श्रमिकांमध्ये काम करणारे इतर अनेक कार्यकर्ते परिषदेला हजर होते. आजुबाजुच्या वावर्ले, पाली, चिचखांबले, आसरा, वेणगाव, गागोदे इ. गावातून सुमारे ३०० लोक परिषदेस जमले होते.

केंद्राचे संचालक श्री. शरद कुलकर्णी यांनी आपल्या प्रास्ताविकात केंद्राच्या कामाचे स्वरुप व ह्या भागात गेल्या १।२ वर्षात केलेल्या कामाची माहिती दिली. त्यांनी धनाढ्यांकडून ह्या भागात चाललेल्या जमिनींच्या लुबाडणुकीकडे लक्ष वेधले. तसेच पिण्याच्या पाण्याच्या समस्येचा, शिक्षणाच्या सोयींचा तातडीने विचार झाला पाहिजे असे सुचविले.

तारा—पनवेल भागात काम करणाऱ्या श्रमिक क्रांतीकारी आंदोलनाच्या कार्यकर्त्या ॲड. सुरेखा दळवी यांनी त्या भागातील आदिवासींना ग्रा. पं. त सुद्धा स्थान नसल्याचे सांगून कोठेही चोरी झाली की कातकरी । ठाकर यांनाच दोषी समजले जाते त्यामुळे पोलीस आपला संरक्षक आहे असे वाटण्यापेक्षा त्याची भितीच ह्या लोकांना वाटत असल्याचे दिसून येते असे सांगितले. ह्या भागात घरे बांधून देताना ५।६ माणसे राहू शकतील तसेच बाजूला बकऱ्या-गुरांकरीता सोय होऊ शकेल त्याचा विचार केला पाहिजे असे त्यांनी सुचविले. कोळसा भट्टीवर काम करणाऱ्या मजुरांच्या पिळवणुकी, विरूद्ध तसेच वर्सोवामुंबई भागात बोटीवर मासेमारी, करीत जाणाऱ्या मजुरांना किमान वेतन मिळवून देण्याच्या दृष्टीने संघटित प्रयत्नांची आवश्यकता असल्याचे त्यांनी सुचविले. ह्या भागातील कातकरी । आदिवासींचे प्रश्न काही व्यक्ती वगळता संघटना किंवा राजकीय पक्षांकडून मांडले गेले नसल्याची खंत त्यांनी ह्यावेळी व्यक्त केली व हे प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने सर्व श्रमिक—गरिबांच्या एकजुटीच्या आवश्यकतेवर त्यांनी आपल्या भाषणात भर दिला.

ॲकेडमी ऑफ डेव्हलपमेंट सायन्सचे श्री. मठपती यांनी आदिवासींमध्ये संघटनात्मक काम करण्याच्या प्रयत्नांवर भर देण्याबरोबरच जंगलात राहणाऱ्या ह्या माणसांना ह्या भागात उपलब्ध साधनसामुग्रीचा स्थानिक पातळीवर रोजगार मिळवून देण्याचे दृष्टीने कसा उपयोग करून घेता येईल ह्यासंबंधीही जागृती करण्याची आवश्यकता प्रतिपादन केली.

## संघटित होण्याचे आवाहन

केन्द्राचे प्रमुख कार्यकर्ते श्री. नारायण वावर्ले यांनी ह्या भागातील पिण्याच्या पाण्याच्या समस्येचा तसेच रोजगाराच्या समस्येचा आपल्या भाषणात उल्लेख केला तसेच सिलिंगखाली धनाढ्यांना जमीन वाटप होत असल्याबद्दल व आदिवासींच्या जमीन हस्तांतराची प्रकरणे अद्यापही अनिर्णित अवस्थेत शासनाकडे पडून असल्याचे सांगून ह्या बाबतीत शासनाने त्वरीत कार्यवाही करावी अशी त्यांनी मागणी केली. मात्र आदिवासी-कातकरी सर्वांनी त्याकरिता संघटीत झाले पाहिजे असे त्यांनी आवाहन केले.

प्रमुख पाहुणे श्री. काळूराम धोदडे यांनी स्वातंत्र्यानंतरही आदिवासींना—गरिबांना जगण्याचे साधन नसल्याची खंत व्यक्त करून येथे श्रम करणाऱ्याची नेहमीच लूट होत असल्याचे सांगितले. बांधील गड्यांपैकी ९५% आदिवासींपैकीच असून त्यांनी जेमतेम, रात्रीची झोप एवढीच काय ती विश्रांती मिळत असल्याचे सांगितले. येथून कोळसा भट्टीवर जाणारा मजूर परत येताना काहीही घेऊन येऊ शकत नाही, तो जेमतेम जगूनच येतो अशी स्थिती असून त्याविरूद्ध संघटित आवाज उठविण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी सुचविले. येथील अन्याय अत्याचाराचे आपण बळी ठरत असून

त्याविरूद्ध सर्वांनी एकजुटीने आपल्या प्रश्नांकरीता लढण्याचे त्यानी आवाहन केले.

शे. का. प. चे चिटणीस श्री. राऊत व श्री लक्ष्मण पेमारे यानी केंद्र करीत असलेल्या कार्याबद्दल समाधान व्यक्त करून ह्या कामात सहकार्याचे आश्वासन दिले.

परिषदेत श्रमजिवी संघटनेचे श्री. विवेक पंडित यांनीही माणुसकीसाठीच्या ह्या लढयाचा संघटना हा एकमेव मार्ग असल्याचे नमूद केले. रूरल कम्यन्सचे श्री बालाजी तोरवाड भूमीसेनेचे श्री. यशवंत हाडळ यांचीही ह्यावेळी भाषणे झाली. केंद्राचे कार्यकर्ते श्री. शांताराम आंब्रे यांनी शेवटी आभार मानले.

परिषदेच्या निमित्ताने रात्री परिसरातील लोकांचा 'नाच स्पर्धा' झाल्या. ह्या स्पर्धेत प्रथम, दुसऱ्या, तिसऱ्या क्रमांकावर आलेल्यांना भिलवले तरुण मंडळातर्फे बक्षिसे देण्यात आली. परिषदेची संपूर्ण व्यवस्था भिलवले तरुण मंडळातर्फे करण्यात आली होती. ☐

# मागण्यांचे निवेदन

खालापूर तालुक्याची एकूण १८००७ आदिवासी लोकसंख्या आहे यापैकी १५९० शेतकरी असून ५३५२ शेतमजूर आहेत. तालुक्यातील आदिवासींमध्ये शिक्षणाचे प्रमाण फारच कमी आहे. एकूण लोकसंख्येपैकी १३४६ साक्षर असून त्यापैकी १०१७ पुरुष तर फक्त ३२९ स्त्रिया आहेत. काही लोकांकडे शेती असली तरी ती फारच कमी म्हणजे सरासरी १ एकर किंवा त्यापेक्षाही कमी असलेली किंबहुना ती पिकाच्या दृष्टीने फारशी उपयुक्त नसलेलीच असावी.

शेती, शिक्षण, रोजगार, आर्थिक उन्नती ह्या संदर्भात शासनाच्या अनेक योजना असल्या तरी त्या ह्या समाजापर्यंत पूर्णांशाने पोचलेल्या दिसत नाहीत. शासनाने कातकर वाडयावर घरकुल योजना राबवून बऱ्याच जणांना घरे बांधून दिली असली तरी अनेक ठिकाणी घराचे प्रश्न आहेतच. भिलवले येथे शासनाने ५१ जणांना सुमारे ५१ एकर जमीन वाटप केली आहे; परंतु ती लागवडीखाली येण्याच्या दृष्टीने कोणतीही योजना शासनाकडे नसल्याने बरीच जमीन कसवणूकीखाली येऊ शकत नाही. आदिवासी कल्याण योजनेंतर्गत बँकांमार्फत बकऱ्या वाटप अनेक वाडयांवर झाले असले तरी त्या संदर्भात कोठेही पाठपुरावा केल्याचे आढळत नाही. एक तर बँका जेथून ह्या बकऱ्या खरेदी करून आदिवासींना वाटप करतात त्या भागातील बकऱ्यांना ह्या भागातील ऊनपाऊस सहन होत नाही अशी सर्वच वाडयांची तक्रार असून त्यांना गावठी बकऱ्या मिळाव्या अशी त्यांची मागणी आहे. चाकणहून खरेदी करून दिलेल्या बकऱ्या मेल्याच्या अनेकांच्या तक्रारी आहेत. ह्यात लोकांचा अप्रामाणिकपणा काही अंशी गृहीत धरला तरी ह्या योजनेच्या अपयशाचे हे एक मुख्य कारण असल्याचे आढळून येते. चिचखांबले, वावर्ले-ठाकूरवाडी, पाली इ. अनेक गावांना अद्यापही पाण्याची टंचाई जाणवत आहे. शेतकऱ्यांना आदिवासी विकास योजनेअंतर्गत होणाऱ्या खत—बी—बियाण्याचे वाटप वेळेवर होत नाही. मुलांच्या शिक्षणाच्या दृष्टीने असलेली एकच आश्रमशाळा अपुरी आहे. अनेक ठिकाणी सिलिंगखाली जमीन असूनही तिचे वाटप झाले नाही तर काही ठिकाणी मोठ्या श्रीमंतांना अशा जमिनीचे वाटप शासनाने केल्याचे आम्ही शासनाच्या नजरेस आणून दिले आहे. जमीन हस्तांतराची अनेक प्रकरणे असून ह्याबाबतीत शासनाने तातडीने निर्णय घ्यावयाचे असले तरीही अनेक अशी प्रकरणे तहसिलदार प्रांत यांचेकडे पडून आहेत. नियमित रोजगार मिळत नसल्याने खावटी वगैरे मार्फत सावकारांचे वर्चस्व अद्यापही आढळून येत आहे. त्या दृष्टीने शासनाने रोजगार पुरवावा व खावटी वाटप करणे आवश्यक आहे.

ह्या अनुषंगाने आजची ही परिषद खालील मागण्या करीत आहे.

१) जमीन हस्तांतराची प्रकरणे त्वरीत निकालात काढावी.
२) सिलिंग जमिनीचे बेकायदेशीर वाटप त्वरीत रद्द करावे व शिल्लक सिलिंग जमीन वाटप तातडीने व्हावे.
३) आश्रमशाळाची संख्या वाढवावी.
४) पिण्याच्या पाण्याची योजना कठीण गावांकरिता त्वरीत अंमलात यावी.
५) रोजगार पुरवा.
६) खावटी वाटप करा.
७) सर्वत्र घरकुल योजना अंमलात आणा.
८) बकऱ्या वाटप योजनेची अंमलबजावणी योग्यरीतीने व्हावी.
९) कोळसा व विटभट्ट्यांवर कामासाठी जाणाऱ्या कामगारांची पहाणी करावी. ❋

## रोजगार हमी योजना कामावरील मजुरांचे

# मागणी पत्र

१. रोजगार हमी कामावरील प्रत्येक मजुराला त्याने कमविलेल्या नगदी मजुरीतून कोणतीही रक्कम न कापता १ किलो धान्य दर दिवसाला मिळाले पाहिजे.

२. किमान वेतन १८ रु. ( अक्षरी अठरा रुपये ) धरून रोजगार हमी योजना दरपत्रकाचे पुनर्निधारण करण्यात यावे व हे दर महागाई निर्देशांकाशी जोडून दरवर्षी त्याप्रमाणे दरांची पुनर्रचना व्हावी.

३. रो. ह. कामे बाराही महिने मजुरांना मिळू शकतील अशी स्पष्ट तरतूद असलेली दुरुस्ती रो. ह. कायद्यात करण्यात यावी.

४. भ्रष्टाचाराला आळा घालण्याकरिता गवई समितीच्या 'मजुरांना पासबुक' व इतर शिफारशी ताबडतोब अंमलात आणाव्यात.

५. पाच किलोमीटरपेक्षा जास्त अंतरावरील काम दिल्यास प्रवास वाहनाची सोय शासनाने करावी, किंवा प्रवास खर्चाची रक्कम मजुरांना त्यांचे गावात अग्रीम देण्यात यावी.

६. रोजगार हमी कामावरील मजुरांच्या मुलांची शिक्षणाची स्वतंत्र सोय करण्यात यावी व कोणत्याही परिस्थितीत त्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही या करिता आवश्यक त्या तरतुदी करण्यात याव्यात.

७. वर्क साईटवरील मजुरांना 'वर्क साईट समिती' ( त्यात किमान २ स्त्रियांचा समावेश असावा ) बनविल्यास शासनाने त्या समितीला विना अट मान्यता देऊन रोजगार हमीसंबंधीत सर्व कागदपत्रे पाहण्याचा व अंमलबजावणीसंबंधी सूचना देण्याचा समितीचा अधिकार मान्य करावा.

८. रो. ह. मजुरांना किंवा त्यांच्या प्रतिनिधीला रो. ह. संबंधात सर्व शासकीय कागदपत्रे पाहण्याचा अधिकार असावा.

९. एका वर्षात ९० दिवस काम करणाऱ्या स्त्री मजुराला साडी चोळी व पुरुष मजुराला धोतर–सदरा किंवा १० मीटर कापड द्यावे.

१०. रोजगार हमी योजनेसंबंधीचे शासकीय निर्णय व परिपत्रके यांचे शासनाने तयार केलेले 'कॉम्पेडीयम' लोकांसाठी उपलब्ध करून द्यावे.

११. नमुना ५ व ७ मजुराला देताना नमुना ६ रजिस्टर व विशिष्ट कॉलम वाढवून तेथे तारखेसह मजुरांची किंवा त्यांच्या कुटुंबियांची सही किंवा आंगठा घेणे अनिवार्य करावे.

१२. दिलेल्या कामांच्या जागी मजूर मुदतीच्या आत गेले; पण अंमलबजावणी अधिकारी आले नाहीत किंवा कामच सुरू झाले नाही तर कामाचे जागेजवळील कोणत्याही ग्रामपंचायतीने मजूर कामावर आल्याबाबतचा व अंमलबजावणी अधिकारी गैरहजर असल्याबाबतचा दाखला द्यावा व तो पुरावा म्हणून मान्य करण्यात यावा, अशी तरतूद करण्यात यावी.

१३. एक काम बंद झालेल्या दिवसापासून चार दिवसांच्या आत समिती अधिकाऱ्यांनी दुसऱ्या कामाचे नवीन नमुना ७ स्वत: होऊन निर्गमित करावेत असा स्पष्ट नियम असावा.

१४. नमुना ८ अर्जाची पोच देणे अनिवार्य असावे.

१५. मंजूर असलेल्या व त्याच महिन्यात सुरू होऊ शकणाऱ्या तालुका क्षेत्रातील कामांची यादी तहसील कार्यालयात व प्रत्येक गावापासून ५ किलोमीटर अंतराचे आतील कामांची यादी त्या त्या गावच्या ग्रामपंचायतीत दर महिन्याला लावण्यात यावी.

१६. शासन जाहीर करणार असलेल्या मस्टरच्या दुय्यम प्रतीमध्ये ( कार्बन कॉपीत ) मागील आठवड्यात त्या मजुराने मिळविलेल्या मजुरीचा आकडाही नमूद असावा.

१७. रोजगार हमी कायदा व नियम या संबंधात महाराष्ट्रातील सर्व नोंदणी अधिकारी व समिती अधिकाऱ्यांचे शासनातर्फे प्रशिक्षण करण्यात यावे.

१८. आजच्या रोजगार हमी कायद्यामध्ये काम मागितल्यावर प्रत्यक्ष काम मिळण्याकरिता १५ दिवसांची मुदत ठेवण्यात आली आहे. त्यामुळे गरजू, गरीब मजुराला मागितल्यावर प्रत्यक्ष काम मिळेपर्यंतच्या मुदतीच्या काळात उपासमारीला तोंड द्यावे लागते. हे टाळण्यासाठी या मधल्या मुदतीच्या काळात अंबर चरख्यासारखे काम व दररोज मजुरी देण्याची स्पष्ट तरतूद करण्यात यावी.

१९. महाराष्ट्र शासनाची वृक्षरहित जमिनीवर वनीकरणाची योजना रो. ह. योजनेशी जोडण्यात यावी. किमान दहा वर्षांकरिता सतत रोजगाराची आवश्यकता आहे अशा व्यक्तिने समिती अधिकारी. रो. ह. यांचेकडे कामाची मागणी केल्यास वनविभागाच्या योजनेप्रमाणे २ हेक्टर वृक्षरहीत जमिन व १५० रु. महिना रो. ह. कायद्याअंतर्गतचे काम म्हणून आदिवासी, दलित व भूमिहीनांना अग्रक्रमाने देण्याची तरतूद करण्यात यावी.

२०. कायम स्वरूपाचे उत्पादक काम म्हणून मजुरांना अंबर चरखा व बुनाईचे प्रशिक्षण रो. ह. योजनेअन्तर्गत देण्यात यावे. त्यानंतर अशा केन्द्रातून प्रशिक्षित मजुरांना कायम स्वरूपाचा रोजगार उपलब्ध करून देण्यात यावा. या केन्द्रातून उत्पादन होणारे कापड निमशासकीय व शासकीय अनुदानावर काम करणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांना त्यांच्या पगाराच्या रकमेच्या प्रमाणात पगाराचा हिस्सा म्हणून सक्तीने पुरविण्यात यावे.

२१. तालुक्यापासून जिल्ह्यापर्यंत त्या क्षेत्रातील सर्व रजिस्टर्ड ग्रामीण मजदूर संघटनांच्या प्रतिनिधींना त्या त्या पातळीवरील रो. ह. योजना समित्यामध्ये पदसिद्ध प्रतिनिधीत्व देण्यात यावे.

२२. रोजगार भत्ता हा त्या भागातील शेतमजुरांच्या किमान वेतनाइतकाच असावा.

२३. रो. ह. कायद्यातील तरतुदीप्रमाणे ग्रामीण मजुरांना कुशलतेचे प्रशिक्षण देण्यात यावे व आज जी कुशल कामे कंत्राटदारांना देण्यात येतात ती त्यांना न देता खात्यामार्फतच करण्यात यावीत व त्यावर प्रशिक्षित कुशल मजुरांना रो. ह. यो. अंतर्गतच काम पुरविण्यात यावे.

२४. गरोदर स्त्री मजुरांना सवेतन सुटीकरीता १५० दिवस कामाची अट बदलून ६० दिवस करण्यात यावी.

२५. ग्रामीण भागात कायम स्वरूपाचा उत्पादक रोजगार पुरविण्याकरिता रो. ह. यो. अंतर्गत ग्रामोद्योग व कुटीरोद्योगाची कामे घेण्याची स्पष्ट तरतूद करून त्या करिता वेगळी नील प्रत तयार करण्यात यावी.

**( इंडियन फेडरेशन ऑफ बिल्डिंग अँड वूड वर्कर्स यांनी प्रसिद्ध केलेल्या पत्रकाधारे )**



# पाठ परिवर्तनाचे....

## सुधीर जोग

**स्वतंत्र विचार हे शिकण्याच्या प्रक्रियेत अंतर्भूत आहे ही संकल्पना मध्यप्रदेशातील होशंगाबाद जिल्ह्यातील २५५ माध्यमिक शाळांमध्ये व उज्जैन, देवासमधील काही निवडक शाळांमध्ये रुजविण्याचे प्रयत्न होशंगाबाद विज्ञान अध्यापन कार्यक्रमाद्वारे करण्यात येत आहेत.**

मध्यप्रदेशातील शिक्षणपद्धतीमध्ये हा कार्यक्रम परिवर्तन घडवू पाहत आहे. या कार्यक्रमाचे वैशिष्टय असे की त्यामध्ये अंतिम निष्कर्षाइतकेच प्रयोगाअंती निष्कर्षाप्रत पोहोचण्याच्या शास्त्रीय पद्धतीवर भर देण्यात येत आहे तसेच विद्यार्थ्यांनी मूलभूत संकल्पना खऱ्या अर्थाने समजावून घेतल्या पाहिजेत व कोणतीही गोष्ट गृहित धरू नये याकडे विशेष लक्ष देण्यात येत आहे.

शिक्षकाने विद्यार्थ्यांना केवळ मार्गदर्शन करावे व उत्तरे विद्यार्थ्यांनीच हुडकून काढावीत असा प्रयत्न करण्यात येतो. प्रचलित शिक्षण पद्धतीमध्ये विद्यार्थ्यांकडून प्रथम तत्त्वे, नियम पाठ करून घेण्यात येतात आणि नंतर ती सिद्ध करण्यासाठी प्रयोग करण्यात येतात. याउलट या महत्त्वाकांक्षी कार्यक्रमामध्ये प्रयोग व निरीक्षण याला प्राधान्य असून त्यातून शास्त्रीय तत्त्वांचे आकलन व्हावे असा प्रयत्न आहे. विद्यार्थ्यांकडून जेवढे जास्त प्रश्न येतील तेवढा तो पाठ अधिक यशस्वी असे मानण्यात येते.

१९७२ मध्ये श्री. सुदर्शन कपूर व अनिल सद्गोपाल यांच्या संभाषणातून या कार्यक्रमाची कल्पना पुढे आली. सुदर्शन कपुर हे लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्सचे पदवीधर होशंगाबादजवळील रसुलिया येथील फ्रेन्डस् रूरल सेंट्रल या गांधीवादी संस्थेचा कारभार पहात होते तर अनिल सद्गोपाल यांनी कॅलिफोर्निया इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीमधून जीवरसायनशास्त्र व परमाणू जीवशास्त्रामध्ये पीएच.डी. पदवी संपादन केली होती व ते होशंगाबादमध्ये किशोरभारती ही स्वयंसेवी संस्था स्थापन करण्याच्या प्रयत्नात होते. एके दिवशी या दोघांच्या संभाषणामध्ये फ्रेन्डस् सरल सेंटर चालवीत असलेल्या एका पूर्व माध्यमिक शाळेविषयी बोलणे निघाले. गांधीजींच्या 'नयी तालीम' (नवीन शिक्षण) या संकल्पनेवर आधारित प्रयोगादाखल सुरू झालेल्या या प्रकल्पामधून एखाद्या चांगल्या खाजगी शाळेपेक्षा अधिक काहीही निष्पन्न होत नव्हते. श्री. सद्गोपाल यांनी डून स्कूलमधील श्री पित्रे व श्री दिक्षित यांच्या प्रयत्नांची माहिती दिली. या दोघांनी प्रयोगातून पदार्थविज्ञान शिकविणारे पाठ्यपुस्तक तयार केले होते. मुंबईतील ४ महापालिका शाळांनी असा अभ्यासक्रम सुरू केला होता. मात्र परीक्षेबाबतच्या मतभेदांमुळे हा प्रयत्न बारगळला; परंतु ही संकल्पना रसुलियामध्ये प्रत्यक्षात येऊ शकेल याबबतीत कपूर आशावादी होते. त्यांनी या दोन शिक्षकांशी संपर्क साधून व दोन तज्ज्ञ शास्त्रज्ञांना बोलावून या कल्पनेचा विचार करण्यासाठी बैठक घेतली. या प्रकल्पाच्या अंमलबजावणीमध्ये पूर्ण स्वातंत्र्याची मागणी करण्याचे ठरविण्यात आले. मध्यप्रदेशच्या लोकशिक्षण खात्याचे संचालक डॉ. बी. डी. शर्मा यांनी हा कार्यक्रम १६ शाळांतून सुरू करण्यास परवानगी दिली.

### अनपेक्षित अडचणी

पुढच्या तीन वर्षात ग्रामीण भागात विज्ञानाचा प्रसार व उपयोग करण्यातील आव्हाने व अडचणी कार्यकर्त्यांना समजू लागल्या. नवीन क्रमिक पुस्तके लिहावी लागली तसेच काही साधे प्रयोग तयार करावे लागले. काही अनपेक्षित अडचणी निर्माण झाल्या उदा. फुलातील बीजांकुरणावरचा चित्रपट गावकऱ्यांना आकलनच झाला नाही. कारण त्यामध्ये बीजांकुरणाची प्रक्रिया दर्शविण्यासाठी बाणांचा उपयोग करण्यात आला होता. परंतु फुलामध्ये या बाणांचे काम काय असाच प्रश्न गावकऱ्यांना पडला.

यावरून कार्यकर्त्यांना एक उद्‌बोधक पाठ मिळाला. शास्त्रज्ञ व शिक्षणतज्ज्ञ कितीही निष्णात असले तरी ते जोपर्यंत नागरी जीवनानुभव व संकल्पनांच्या कोषातून बाहेर पडत नाहीत तोवर ग्रामीण विद्यार्थ्यांना आकलन होतील अशी पुस्तके ते लिहू शकणार नाहीत. एक कार्यकर्ता गावकऱ्यांची आकारमानाची संकल्पना समजावून घेण्यासाठी त्यांच्यात अनेक दिवस वावरला.

अशा रितीने ग्रामीण विद्यार्थ्यांना आकलन होतील अशी पुस्तके तयार करण्यात आली तसेच अनुभवातून त्यातही योग्य ते बदल करण्यात आले.

१९७५ मध्ये मध्यप्रदेशाच्या लोकशिक्षण संचालकांनी एक नवे क्रांतीकारी पाऊल उचलले. ज्या १६ शाळांतून हा कार्यक्रम चालू होता त्या शाळांतील विद्यार्थ्यांची परीक्षा घेण्याची जबाबदारी त्यांनी किशोर भारती व फ्रेन्स रूरल सेंटरवर सोपवली. प्रश्नपत्रिका काढणे, परीक्षांचे संचालन करणे, उत्तरपत्रिका तपासणे ही तिन्ही कामे या स्वयंसेवी संस्थांवर सोपविण्यात आल्याचे पाहून इतरांना धक्काच बसला. असे यापूर्वी कधीही घडले नव्हते.

१९७८ पर्यंत फ्रेंडस् रुरल सेंटर व किशोरभारती यांनी हा कार्यक्रम पूर्णत: आपल्या जबाबदारीवर चालवला. त्यावर्षी श्री. अशोक वाजपेयी लोकशिक्षण संचालक झाले. त्यांनी हा कार्यक्रम संपूर्ण होशंगाबाद जिल्ह्यात राबवण्याचे ठरविले. ही जबाबदारी सरकारने उचलली. पुढील वर्षी फ्रेंडस् रुरल सेंटरने या कार्यक्रमातून अंग काढून घेतले. त्यामुळे किशोरभारतीच्या कार्यकर्त्यांना या मोठ्या कार्यक्रमाची जबाबदारी घेण्यासाठी एका स्वतंत्र संस्थेची आवश्यकता भासू लागली. शिक्षण क्षेत्रामध्ये चौकसवृत्ती व स्वयंशोधन पद्धतीचा प्रसार करण्याच्या उद्दिष्टाने 'एकलव्य' या संस्थेची स्थापना करण्यात आली.

नियोजन मंडळाने बोलावलेल्या केन्द्रिय व राज्य स्तरावरील अधिकाऱ्यांच्या बैठकीत या संस्थेच्या कार्यक्रमासाठी तीन वर्षासाठी २९ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली. या कार्यक्रमाची जबाबदारी 'एकलव्य' ची असली तरी किशोरभारतीचे कार्यकर्ते मदत करीत होतेच. विद्यापीठ अनुदान मंडळाने महाविद्यालयीन शिक्षकांना या कार्यक्रमात तीन वर्षापर्यंत सहभागी होण्याची परवानगी दिली. या कालावधीत त्यांचे वेतन व सेवाज्येष्ठता कायम ठेवण्याची हमी देण्यात आली. या निर्णयामुळे या कार्यक्रमाची परिणामकारकता वाढली. या कार्यक्रमात सक्रिय सहभागी झालेले दिल्ली विद्यापीठातील रसायनशास्त्राचे प्रपाठक श्री. मनमोहन कपूर यांच्या मते—शाळांतून सोडाच परंतु प्रमुख विद्यापीठांतूनसुद्धा आग्रक्रम चुकीचे असतात. प्रकाशित संशोधन निबंधाची संख्या व पीएच्. डी. च्या विद्यार्थ्यांची संख्या हे विद्यापीठीय शिक्षकांच्या यशस्वीततेचे मानदंड ठरले आहेत. उत्तम शिक्षण असणे ही बाब त्यामानाने दुय्यम मानण्यात येते त्यादृष्टीने निम्न स्तरावरील बदल हा निर्णायक महत्त्वाचा आहे.

## साधी व स्वस्त साधने

या कार्यक्रमात वापरण्यात येणारी साधने अत्यंत साधी व स्वस्त आहेत हे या कार्यक्रमाच्या यशामागचे गमक आहे. या साधनांमध्ये अनुभवातून भर टाकण्यात येते तसेच योग्य त्या सुधारणा करण्यात येतात.

प्रचलित शिक्षणपद्धतीच्या पुरस्कर्त्या शिक्षकांकडून या कार्यक्रमावर टीकाही करण्यात येते. या कार्यक्रमातून उपस्थित होणारे प्रश्नोपप्रश्न व वादविवाद त्यांना व्यर्थ वाटतात. त्यांच्यामते जुन्या पद्धतीनुसार अभ्यासक्रम जलद संपविता येतो. नवीन कार्यक्रमामुळे कामाचा अधिक बोजा पडून वर्गाचे वेळापत्रक विस्कळीत होते. पूर्व माध्यमिक वर्गात या नवीन पद्धतीप्रमाणे शिकलेल्या विद्यार्थ्यांना पुन्हा पारंपारिक पद्धतीकडेच परतावे लागते ही फार गंभीर समस्या आहे. एका अधिकाऱ्यांच्या मते पुन्हा जुन्या पद्धतीकडे वळावे लागत असल्याने नवीन पद्धतीचा प्रभाव कमी होतो. मात्र मध्यप्रदेशचे शिक्षण सचिव श्री अशोक वाजपेयी यांचा या कार्यक्रमाकडे बघण्याचा दृष्टीकोन विधायक आहे. त्यांचे म्हणणे असे की प्रचलित शिक्षणपद्धतीच्या उपयुक्ततेबाबत प्रत्येकजण तक्रार करतो. उलट येथे आपणाकडे एक पर्यायी पद्धती उपलब्ध आहे जी येथेच विकसित झालेली आहे, बाहेरून आणलेली नाही. श्री. वाजपेयी यांची तक्रार आहे की काही शिक्षणतज्ज्ञांना हा कार्यक्रम म्हणजे आपल्या कार्यक्षेत्रावर अतिक्रमण वाटते व केवळ यामुळेच ते या कार्यक्रमावर टीका करतात.

आज 'एकलव्य'पुढे तीन पर्याय आहेत. या कार्यक्रमाची व्याप्ती भौगोलिकदृष्ट्या वाढविणे अथवा शाळांमधील उच्च व निम्न स्तरावरील विज्ञान अध्यापनात हा कार्यक्रम स्वीकारणे अथवा पूर्व माध्यमिक शाळांतूनच परंतु इतरही विषयांच्या बाबतीत हा कार्यक्रम अंमलात आणणे. या तिन्ही पर्यायांचा विचार चालू आहे. मात्र एक गोष्ट नि:सशय की या कार्यक्रमावरील सर्व प्रकारची टीका विचारात घेऊनही हा कार्यक्रम चांगला आहे. डॉ. बी. डी शर्मा यांच्या मार्मिक अभिप्रायाप्रमाणे राज्यातील शिक्षणपद्धतीची एकूण अवस्था बघता या कार्यक्रमामुळे तोटा काहीही होऊ शकणार नाही मात्र झाला तर फायदाच होईल. ❋

('इंडिया टुडे' वरून)

**‘वैद्य कसत्ता’ हे डॉ. आनंद नाडकर्णींचे पुस्तक आधु-निक वैद्यकयंत्रणेविषयी विचार करायला आपल्याला भाग पाडते.**

इव्हान इलिच या वादग्रस्त विचारवंताच्या ‘मेडिकल नेमेसीस’ या पुस्तकातले मुख्य विचार हरवू न देता आपल्या देशातल्या स्थळकाळपरिस्थितीनुसार हे एक नवेच पुस्तक लेखकाने तयार केले आहे. आरोग्याचे वैद्यकीकरण किंवा मेडिकलायझेशन म्हणजे काय? हा या पुस्तकातला सर्वात मोठा प्रश्न. आरोग्याच्या साऱ्याच व्यापाराच्या मुळाशी आहे वैद्यकीकरण. ही कथा सांगताना लेखकाचा सगळा रोख भारतावर आहे. पण त्याचबरोबर जागतिक परिस्थितीचे भान सतत जागे ठेवले आहे. वाढत जाणाऱ्या औद्योगिकीकरणाबरोबर वैद्यकाला एका सामाजिक नियंत्रकाचा दर्जा कसा मिळत चाललाय यावर त्यांनी ‘प्लॅस्टरमधलं आरोग्य’ या लेखात झोत टाकलाय. यात वैद्यकीकरणांची विविध अंगे त्यांनी उलगडून दाखवली आहेत. वैद्यकीय सेवा ही जेव्हा एक क्रयवस्तू बनते तेव्हा निरनिराळे व्यावसायिकही निरुपयोगी गरजा तयार करू लागतात. हळूहळू वेगवेगळ्या वैद्यकीय सेवांचे ग्राहक ही भूमिका लोकांवर लादली जाऊ लागते. या ग्राहकांवर नियंत्रण ठेवणारा डॉक्टर क्रयक्रियाशी निगडीत होऊन डब्यातले दूध, बालान्ने, अँटिबायोटिक्सचा बेजबाबदार वापर अशासारख्या गोष्टींना चालना मिळते. ‘कशासाठी—गोळ्यांसाठी’ वाढणारे डबे आणि आटणारे दूध या मार्मिक शिर्षकांच्या लेखांतून वैद्यकीकरणमागच्या आर्थिक व्यवहाराचे चित्र डोळ्यासमोर उभे केले आहे. अशा आपल्या आजच्या व्यवस्थेतून रुग्णाची स्वतःच्या आरोग्याबद्दलची भूमिका पूर्णपणे परावलंबी कशी बनत जाते आणि आरोग्य म्हणजे गोळ्या, तपासण्या व डॉक्टर हे पूर्णपणे डॉक्टरभोवती फिरणारे समीकरण कसे तयार होते याचे विवरण केले आहे. पाश्चिमात्य देशाचं अनुकरण करणारी आरोग्यपद्धती आपण स्वीकारून वैद्यकावर आरोग्याची पूर्ण जबाबदारी टाकणं म्हणजे अतिरिक्त वैद्यकीकरणाला स्वतःहून आमंत्रण देणं आहे. वैद्यकशास्त्रीय भाषेत ‘आएट्रोजेनिक रोग’ अशी एक संज्ञा आहे. उपचारा दरम्यान डॉक्टरमुळे कळत नकळत होणारे रोग असा याचा अर्थ आहे. ह्याचा संदर्भ घेऊन आरोग्यनियोजनाच्या पद्धतीतून एक अनारोग्यकारक यंत्रणा तयार करणाऱ्या या साऱ्या घडा-




मोडींचा विस्तार समजून घ्यायचा, ‘सामाजिक आएट्रोजेनेसीस’ व ‘सांस्कृतिक आएट्रोजेनेसीस’ हे अचूक शब्द प्रयोग इलिचने वापरले आहेत.

## चार प्रमुख वाटा

वैद्यकसत्ता या पुस्तकाचे मोल ते केवळ वैद्यकाला सामाजिक नियंत्रकाचे स्थान कसे प्राप्त होत गेले व यातून सामाजिक व सांस्कृतिक आएट्रोजेनेसीससारख्या प्रक्रिया कशा रूजत गेल्या हे सुलभपणे सांगते म्हणून नव्हे तर घडामोडींबाबत आपले भान वाढीस लागले आणि सामाजिक जाणिवेत त्याचे रूपांतर झाले तर वैद्यकीकरण काबूत आणल्या जाऊ शकेल ही गोष्ट ते निदर्शनास आणते म्हणून.

लेखकाने आरोग्य सुधारणाच्या चार प्रमुख वाटा आपल्यापुढे मांडल्या आहेत. त्या म्हणजे उपचारपद्धती, प्रतिबंधक उपाय, शिक्षण व संशोधन. यापैकी नेमकी कुठली वाट स्वीकारावी याचा बराच उहापोह आरोग्य नियोजकांमध्ये होत असतो. भारतात असे दिसते की, इतर विकसनशील देशांबरोबर आपणही उपचारपद्धती व उपचार या गटाखाली येणाऱ्या सर्व सोयी झपाट्याने स्वीकारत आहोत. उपचारपद्धतीवर अनाठायी भर दिल्याने रोग नसतानाही उपचार करणे सोपे होते व वैद्यकीय भ्रष्टाचार रुजवायला विनायास मदत होते. सांस्कृतिक व सामाजिक परिस्थितीशी फटकून ही उपचारपद्धत राबवली जाते तेव्हा काय फलित होते हे ‘झोपडपट्टीतील आरोग्य’ हे लेखात दिसून येते. ‘तिथल्या वस्तीतल्या लोकांना वाटायचं कुटुंबकल्याणचं काम चालू आहे, डॉक्टर लोकांना पगार मिळावा म्हणून.’ त्याचा आपल्याशी काही संबंध नाही. होता होता हे आरोग्य-केंद्र त्या वस्तीत पसरण्याऐवजी केवळ एक बेट बनून

राहिलं. थोड्याफार फरकानं हीच स्थिती सर्वत्र आढळते.

उपचारपद्धतीचं सखोल शिक्षण देणाऱ्या संस्थामध्ये आणि त्यांच्या विद्यार्थ्यांमध्ये प्रतिबंधक उपायांची हेळसांड पहायची असेल तर कुठल्याही मेडिकल कॉलेजच्या विद्यार्थ्याला प्रिव्हेंटिव्ह अँड सोशल मेडिसीनच्या पेपराबाबत बोलताना ऐकावे. इतर अभ्यासाच्या ओझ्याखाली दबलेल्या या विद्यार्थ्यांचा सूर नेमका इथं अनास्थेचा आणि टिंगलीचा होतो. अशा प्रकारच्या संस्थातून शिक्षण आणि संशोधन लोकांना उपचाराधीन करणाऱ्या अत्याधुनिक तंत्राचे होत रहाते आणि दुसरीकडून वैदूंना अधिक ज्ञान देऊन स्वावलंबी करणे स्थानिक वनौषधींवर संशोधन करून त्यांचा योग्य तेव्हा प्रसार करणे, लोकांना प्राथमिक आरोग्याची त्यांच्या भाषेत माहिती देणाऱ्या शिक्षणाचा आणि संशोधनाचा पाया घालण्याच्या कल्पनाही आपण आयात केलेल्या उपचारपद्धतीच्या चौकटीत न बसल्याने त्यांना सहजासहजी डावलणे सोपे होत जाते.

अर्थात शिक्षणाने सगळेच प्रश्न सुटू शकणार नाहीत याची लेखकाला चांगली जाण आहे. तो म्हणतो त्यांचे मूळ आर्थिक परिस्थितीतच शोधावे लागेल. कारण ग्रामीण आरोग्याची मुख्य समस्या कुपोषण व प्रथिनांचा अभाव ही आहे. 'भाकरी व केक' या लेखात आधुनिक वैद्यकीय उपचार व ग्रामीण आरोग्याची समस्या यातल्या अंतरावर लेखकाने नेमके बोट ठेवले आहे. वैद्यकाचा इतिहास चाळताना लक्षात येते की, अनेक रोगांची तीव्रता कमी होण्याचे प्रमाण केवळ वैद्यकाच्या प्रगतीवर अवलंबून नव्हते तर सामाजिक आर्थिक बदलांशी ते जास्त निगडीत होते. हे निदान एकदा लक्षात आल्यावर आरोग्याचा प्रश्न व त्याला मिळणारी उत्तरे केवळ उपचारपद्धतीत शोधणे व तिथे ती मिळू शकतात या भ्रमजालाला विरोध करणे हे वैद्यकीकरणाला काबूत आणण्याचे पहिले पाऊल ठरते.

आधुनिक वैद्यकाच्या कक्षा आता झपाट्याने रुंदावत आहेत. आरोग्याचे संरक्षण करायचे तर जागतिक पातळीवर युद्ध, किरणोत्सर्जन यांना विरोध करणे हे आपले कर्तव्य आहे ही जाण पश्चिमेकडच्या काही डॉक्टरांमध्ये वाढीस लागत आहे. याचा मतलब आधुनिक तंत्रज्ञान नाकारणे हा नसून ते संशोधन लोकोपयोगी आहे किंवा नाही, तसेच ते लोकांच्या जीवनपद्धतीशी 'अकारण' अंतर वाढवणारे आहे का यासारख्या निकषांवर घासून मगच ते स्वीकारण्याचा आग्रह आहे. यासंबंधात लेखकाने दिलेले 'जयपूर फूट' चे उदाहरण पुरेसे बोलके आहे. शस्त्रक्रिया करून पाय कापावा लागला आहे अशा रूग्णांना कृत्रिम पाय देण्यात येतात ते लाकूड, प्लॅस्टीक, पावलाला बूट असे पूर्णपणे शहरी जीवनावर आधारित असे मॉडेल असे. ग्रामीण भागात हाच पाय घेऊन चिखल राडीत कसं काय करायचं हा प्रश्न असायचा. थोड्याच दिवसात ग्रामीण रूग्ण हा पाय वापरायचे सोडून देत. जयपूरच्या डॉ. सेठींनी रबरावर विशिष्ट प्रक्रिया करून हलका, लवचिक, पाय बनवला. हा पाय तयार करण्यास फार मोठ्या तांत्रिक उपकरणांची गरज लागत नाही. त्याची किंमतसुद्धा फार कमी आहे. ग्रामीण वा शहरी रूग्णांना तो सारख्याच सोयिस्करपणे वापरता येतो.

तसेच ग्रामीण आरोग्याच्या रक्षणासाठी परभारे परकी व्यवस्था न लादता ग्रामीण जनता व आरोग्यकेंद्र यात कशा तऱ्हेचे पूल बांधल्या गेले पाहिजेत हे सांगताना लेखकाने हेमलकसा व डॉ. आरोळेंच्या कामाची नेमकी उदाहरणे दिलेली आहेत.

या सगळ्या चर्चेतून लेखकाने माडलेला महत्त्वाचा मुद्दा असा की, पारंपारिक आधुनिक वैद्यक या दोन्ही संस्था सामंजस्य व श्रमविभागणीच्या तत्त्वावर चालू शकतात; पण प्रत्यक्षात हे दुवे घालणे फार गुंतागुंतीचे ठरू शकते कारण परंपरागत वैद्यकाला पण काही प्रमाणात बदलणे आणि आधुनिक वैद्यकाला आपले अनेक पूर्वग्रह तपासणे अनिवार्य होते. वैद्यकीय मानवशास्त्रासारखे नवे शास्त्र या पूल बांधणीच्या कामात महत्त्वाची भूमिका बजावू शकते हे येथे आवर्जून नमूद करावेसे वाटते.

वेदना, दुखी या शरीरशास्त्रीय व पर्यायानं वैद्यकीय मानल्या जाणाऱ्या संज्ञांची व्याख्या करणं फार कठीण आहे. संस्कृती व आरोग्य यांची सांगड घालण्याची प्रथा मानववंशाइतकी जुनी आहे. पण दुखी, आजार, अपगत्व, मृत्यू या साऱ्यांचा प्रत्येक संस्कृतीनं स्वतःचा असा एक खास अन्वय लावलेला दिसून येतो. या साऱ्यातूनच सहनशक्ती जन्माला येते. आधुनिक युगानं मात्र दुःख, आजार, वेदना, मृत्यू या साऱ्यांनाच एका वैद्यकशास्त्राच्या दावणीला बांधलं आहे आणि साऱ्याच सांस्कृतिक घटकांना एकाच फटक्यात 'बुरसटलेले

विचार ' म्हणून बाजूला केलंय. वेदना, दुखी हे सारं फक्त तांत्रिक तक्रारींपुरतं मर्यादित राहतंय.

या पार्श्वभूमीवर आरोग्य, शरीरसत्व, मृत्यू या घटकांबाबत भारतीय संस्कृतीचा विचार मांडून आपल्या दुरावत चाललेल्या सांस्कृतिक संचिताची लेखकाने पुन्हा एकदा जाण करून दिलीय.

लिखाणाची ताजी शैली व लेखांची मार्मिक शीर्षके यामुळे हे पुस्तक वाचनीय झाले आहे. मात्र काही संदर्भ अपुरे आहेत. पुस्तकाच्या शेवटी व्यवस्थित संदर्भसूची जोडली असती तर पुस्तक अधिक नेटके झाले असते.


आधुनिक वैद्यकव्यवहार, आपली सामाजिक आर्थिक परिस्थिती आणि सांस्कृतिक संचित यांच्यातील निखळलेले दुवे शोधण्याचा प्रयत्न करणारे पुस्तक मराठीत लिहिले जावे याला विशेष महत्त्व आहे.

—सुषमा सोनक

**वैद्यकसत्ता**

**डॉ. आनंद नाडकर्णी**

**ग्रंथाली प्रकाशन, मुंबई १९८३**




# राजमाची ग्रामसहाय्य योजना

**राजमाची ' उधेवाडी ' हे लोणावळा परिसरातील भर घाटमाथ्यावरील चिमुकले खेडे. अशा खेड्यांपर्यंत शासकीय विकास योजना किंवा स्वयंसेवी संस्थांचे कार्य पोहोचणे कठीणच असते. अशा ह्या दुर्गम खेड्याच्या सर्वांगीण विकासासाठी राजमाची ग्रामसहाय्य योजना, मुंबई ही संस्था गेली आठ वर्षे प्रयत्नशील आहे.**

वैद्यकीय सेवा, शिक्षण, आर्थिक विकासाचे दृष्टीने छोटे–छोटे प्रकल्प राबविणे, वृक्षारोपण, पाणीपुरवठा योजना व इतर विकासाची कामे संस्था सातत्याने करीत आली आहे.

**वैद्यकीय सेवा :** दर दोन–तीन आठवड्याला डॉक्टर त्या गावाला जातात व औषधोपचाराची सोय विनामूल्य केली जाते. खोकला, थंडी-ताप, पोटदुखी, अमांश डोळे येणे, त्वचा रोग इ. आजार गावात दिसून येतात. कु–पोषण, पुरेशा कपड्यांचा व अंथरूण–पांघरूणाचा अभाव, पावसाळी हंगामात घरातील ओल इ. मुळे हे आजार उद्भवत असतात.

**शिक्षण :** गावात जि. प. ची प्राथमिक शाळा असून इयत्ता ५ वी पर्यंतचे वर्ग आहेत. नंतरच्या शिक्षणासाठी मुलांना बाहेरगावी राहावे लागते. अशा मुलांना शिक्षणासाठी गरीब मुलांच्या शिक्षणाविषयी आस्था असलेल्या व्यक्तींकडे ठेवण्याची व्यवस्था संस्था करीत असून आतापर्यंत अशी १५ मुले पुणे, ठाणे, मुंबई ह्या ठिकाणी ठेवलेली आहेत. ह्यापैकी ५ मुली आहेत. ही मुले आता ६ वी ते ९ वी मध्ये शिकत आहेत. शाळकरी मुलामुलींना पुस्तके, वह्या व लेखन साहित्य, गणवेष व पादत्राणे, साबण, तेल इ. साहित्य संस्थेमार्फत नियमीतपणे पुरविले जात असते. त्याशिवाय वार्षिक परिक्षेत प्रत्येक वर्गात पहिल्या व दुसऱ्या क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्यांना पारितोषिके. विशेष शिकवणी ह्यात अवांतर वाचन, सामान्यज्ञान व कथाकथन वक्तृत्व, खेळ, कवायत ह्यावर लक्ष दिले जाते. संस्थेचे कार्यकर्ते आपल्या नियमीत भेटीत मुलांना एकत्र जमवून खेळ गाणी, कवायत, गोष्टी इ. कार्यक्रम घेतात. ह्या व्यतिरिक्त संस्थेतर्फे बालवाडीही चालविली जाते.

**वृक्षारोपण :** संस्थेतर्फे तयार केलेल्या रोपवाटिकेतील फणस, काजू, सुबाभूळ, गुलमोहर इ. झाडांची तसेच वनखात्याच्या रोपवाटिकेतून आणलेल्या निलगीरी, सुरू, चिंच इ. झाडांची परिसरात लागवड केली आहे.

**पाणी पुरवठा योजना :** गावकऱ्यांना भरपूर स्वच्छ पाण्याचा पुरवठा व्हावा म्हणून त्या भागातील मनोरंजन किल्ल्यावरील तळे व टाक्यातील पाणी पाईप बसवून गावापर्यंत आणण्यात आले आहे. ही योजना ८१–८२ मध्ये पूर्ण करण्यात आली.

**अल्पबचत निधी :** गरजूंना अडी–अडचणीप्रसंगी कर्ज देण्याच्यादृष्टीने काही काळ गावकऱ्यांकडून दर आठवड्याला बचत गोळा केली जात असे मात्र आता सदर निधी व्यवस्था बंद झाली आहे.

ह्या व्यतिरीक्त संस्थेमार्फत रेशीम उद्योग व तुती लागवड कार्यक्रम राबविला जात आहे. गावातील

रस्त्यावर मुरूम व खडी टाकून रस्त्याची दुरूस्ती करणे मनोरंजन किल्ल्यावर जाण्यासाठी पाऊलवाट तयार करणे ही कामेही हाती घेण्यात आली.

एकात्मिक ग्रामीण योजनेअंतर्गत ८ गावकऱ्यांना शेळ्या पाळणे, गाय पाळणे, सुतार कामाची हत्यारे शिवणयंत्रे खरेदी करणे इ. साठी कर्ज मिळवून देण्यासाठी संस्थेने प्रयत्न केले.

दारूच्या घातक व्यसनापासून गावकऱ्यांनी मुक्त व्हावे तसेच वनातील चोरटी लाकूड–तोड थांबवावी म्हणून संस्था प्रयत्नशील असून त्याचे काही चांगले परिणामही अनुभवास येत असेल तरी काही गावकरी अशा प्रयत्नाआड येत असल्याचे दृश्य दिसत आहे. मात्र अशा गावकऱ्यांना संस्थेने सहकार्य करण्याचे नाकारले असून इतर गावकऱ्यांसाठी विविध कार्यक्रम व योजना संस्था राबवित आहे.

ह्याशिवाय श्रमशिबीरांचे आयोजनही संस्थेमार्फत केले जात असते. विविध क्षेत्रातील अनेक व्यक्तींचे। संस्थांचे सहाय्य ह्या प्रकल्पास मिळत असले तरी अशा विविध क्षेत्रातील ज्ञान व अनुभव असणाऱ्या कार्यकर्त्यांचे सहकार्य या प्रकल्प विस्तारासाठी उपयुक्त ठरेल. त्यादृष्टीने अधिकाधिक कार्यकर्त्यांनी ह्या संस्थेने हाती घेतलेल्या कार्यामध्ये सहभागी व्हावे व एका दुर्गम परंतु निसर्गरम्य परिसरात काम करण्याचा आनंद अनुभवावा अशी अपेक्षा आहे.

❋

**संस्थेचा पत्ता :**

मुकुंद गोंधळेकर,
कार्यवाह, राजमाची ग्राम सहाय्य योजना–
एल । ५४ रिझर्व्ह बँक स्टाफ क्वार्टर्स,
मराठा मंदिर मार्ग, मुंबई सेंट्रल,
मुंबई–४००००८.

## श्रद्धांजली

● दि. ३० ऑक्टोबर रोजी झालेल्या पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांच्या निर्घृण हत्येने सर्व भारतीय जनतेला धक्काच बसला. श्रीमती इंदिरा गांधी यांना गरिबांबद्दल व विशेषत: आदिवासी समाजाबद्दल विशेष कळवळा होता. आदिवासी जनतेचेही त्यांच्यावर खास प्रेम होते.

● महाराष्ट्राचे ज्येष्ठ व लोकप्रिय नेते खासदार यशवंतराव चव्हाण यांचे दि. २५ नोव्हेंबर रोजी अकाली दु:खद निधन झाले. श्री. चव्हाण यांना आदिवासी-उपेक्षित-भटके याबद्दल खास जिव्हाळा होता. सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्यांशी ते सतत संपर्क ठेवत व यातील नव्या प्रवाहांना जाणून घेत असत.

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदतर्फे या दोन्ही नेत्यांना विनम्र श्रद्धांजली.

| | | | |
|---|---|---|---|
| ' हाकारा ' पहिला, जानेवारी-मार्च | १९८० | : | जबरन जोत जंगल जमीन |
| ' हाकारा ' दुसरा, एप्रिल-जून | १९८० | : | आदिवासी व शिक्षण |
| ' हाकारा ' तिसरा, जुलै- सप्टेंबर | १९८० | : | आदिवासी व वनसंवर्धन |
| ' हाकारा ' चौथा, ऑक्टोबर-डिसेंबर | १९८० | : | आदिवासी साहित्य व कला |
| ' हाकारा ' पाचवा, जानेवारी-मार्च | १९८१ | : | दलितांना सवलती व राखीव जागा माहिती |
| ' हाकारा ' सहावा, एप्रिल-जून | १९८१ | : | आदिवासी व आरोग्य |
| ' हाकारा ' सातवा, जुलै-सप्टेंबर | १९८१ | : | वनशेती व वनसंवर्धन |
| ' हाकारा ' आठवा, ऑक्टोबर-डिसेंबर | १९८१ | : | रोजगार हमी योजना |
| ' हाकारा ' नववा, जानेवारी-मार्च | १९८२ | : | उत्तरा खंड अभ्यास मोहीम |
| ' हाकारा ' दहावा, एप्रिल-जून | १९८२ | : | धरणे व विकास |
| ' हाकारा ' अकरा-बारा, जुलै-डिसेंबर | १९८२ | : | जंगल व्यवस्थापन |
| ' हाकारा ' तेरावा, जानेवारी-मार्च | १९८३ | : | आदिवासी व दारू |
| ' हाकारा ' चौदावा, एप्रिल-जून | १९८३ | : | आदिवासींच्या सामाजिक / राजकीय चळवळी |
| ' हाकारा ' पंधरावा, जुलै-सप्टेंबर | १९८३ | : | प्रा. सरदार गौरव अंक / आदिवासी साहित्य |
| ' हाकारा ' सोळावा, ऑक्टोबर-डिसेंबर | १९८३ | : | आदिवासी साहित्य व सामाजिक प्रश्न |
| ' हाकारा ' सतरावा, जानेवारी--जून | १९८४ | : | आदिवासींमधील स्वयंसेवी कार्य |
| ' हाकारा ' अठरावा, जुलै--सप्टेंबर | १९८४ | : | आदिवासी स्त्री |


## यांच्या सहकार्याबद्दल परिषद आभारी आहे

१. शिक्षण व युवक कल्याण मंत्रालय, भारत सरकार.

२. भारतीय सामाजिक शास्त्र अनुसंधान परिषद, पश्चिम विभागीय केन्द्र.

३. महाराष्ट्र साहित्य संस्कृती मंडळ.

४. आदिवासी कल्याण संचलनालय, महाराष्ट्र शासन.

५. वनविकास महामंडळ, महाराष्ट्र.

६. कम्युनिटी एड अब्रॉड, ऑस्ट्रेलिया.


* * *

**' हाकारा ' आगामी अंक :** १. आदिवासी संघटना

आगामी अंकासाठी लेखक व कार्यकर्त्यांनी आपले लिखाण वा अनुभव परिषदेच्या पत्त्यावर सत्वर पाठवावे.

Registered with the Registrar of Newspapers for India Under No. 35835/80

# महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

(१) आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत संशोधन, चर्चा व प्रकाशन

(२) कार्यकर्त्यांचे शिबिराद्वारे प्रशिक्षण

(३) शासकीय, राजकीय व रचनात्मक कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना एकाच व्यासपीठावर आणून त्यांच्यात आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत आणि विकासाबाबत सुसंवाद घडवून आणणे

(४) मानव विज्ञान व सामाजिकशास्त्रे यांच्या शिक्षकांना व विचारवंतांना, मुख्यत: आदिवासींबाबत अभ्यासकांना, एकत्र आणणे

(५) मानव विज्ञानाच्या सर्व शाखांत अध्ययन, संशोधन, प्रकाशन.

या सर्व उद्देशाने 'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद' स्थापन करण्यात आली आहे. याच उद्देशांचे मूर्त स्वरूप म्हणून 'हाकारा' सुरू करण्यात आला आहे. परिषदेचे सदस्यत्व स्वीकारून आपणही या कार्यात सहभागी व्हावे.

**मानव विज्ञान परिषदेचे सदस्यत्व—**

| | |
|---|---|
| आजीव सभासद | २०० रुपये |
| परिषद वार्षिक सभासद | २० रुपये |
| विद्यार्थी ,, ,, | १५ रुपये |

परिषदेच्या सभासदांना 'हाकारा' विनामुल्य पाठविला जातो.

आपली सदस्यत्व आणि वार्षिक वर्गणी कृपया खालील पत्त्यावर 'महाराष्ट्र मानव-विज्ञान परिषद' (द महाराष्ट्र असोसिएशन ऑफ अँथ्रापॉलॉजिकल सायन्सेस) यांचे नावे पाठवावी. चेक पाठविल्यास अधिक दोन रुपयांची वटणावळ पाठवावी. मनीऑर्डर पाठविल्यास फॉर्ममागे कृपया आपले नाव व पूर्ण पत्ता लिहावा.

**पत्रव्यवहाराचा पत्ता :**

**रा. के. मुटाटकर**
सचिव, महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
ई / ५, प्राध्यापक निवास,
पुणे विद्यापीठ, पुणे – ४११ ००७

* आपल्या क्रियाशील सहकार्याची अपेक्षा आहे ! *